दिनांक. 27/07/2026

प्रति,
**मा.प्रभारी अध्यक्ष**
महाराष्ट्र राज्य कब्बडी असोसियशन,
मुंबई.

विषय : **महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या नवीन सुधारीत प्रारुप घटनेचा मसुदा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर करणे बाबत.**
संदर्भ : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे घटनासमितीचे नियुक्ती पत्र (जा.क्र.62) दि.16.07.2026

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार महाराष्ट्र राज्य कब्बडी संघटनेची घटना कशी असावी या हेतुने कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या घटनासमितीमध्ये आमचा समावेश करण्यात आला आहे.

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील मार्गदर्शक सूचना व महाराष्ट्र राज्य कब्बडी असोसिएशनला संलग्न असणाऱ्या जिल्हा संघटनेच्या कार्यक्षेत्रातील कबड्डी खेळाला व खेळाडूंना प्रगतीच्या दृष्टीने कशी संधी मिळेल व राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाची कामगिरी कशी उंचावेल हा दृष्टिकोन समोर ठेऊन आम्ही सुधारीत घटनेचा प्रारुप मसुदा तयार केला आहे.

सदरील मसुदा हा आपणाकडे सविनय सादर करीत असून, योग्य ते मार्गदर्शन व्हावे. विनंती आहे.

आपले

1) **मोहन गायकवाड** - नाशिक
(अध्यक्ष - घटना समिती)

2) **सुधाकर घाग** - मुंबई उपनगर
(सदस्य - घटना समिती)

3) **प्रा.डॉ.माधव शेजूळ** - परभणी
(सदस्य - घटना समिती)

# प्रारुप घटना

---

**सुधारित ज्ञापन**

परिशिष्ट 'ब'

# महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई

या संस्थेचे ज्ञापन (मेमोरंडम ऑफ असोसिएशन)

1. संस्थेचे नाव : **महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई**
   रजि.नं.बी.पी.टी. ॲक्ट 1950 क्र.एफ 626/1956
2. संस्थेचा पत्ता : **महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन**
   वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क,
   दादर (प.) मुंबई-400028
   ईमेल : maharashtra.kabaddi@gmail.com
   दूरध्वनी : 022-24448494
3. **संस्थेचे ध्येय :** महाराष्ट्र राज्याच्या कार्यक्षेत्रातील (विदर्भ वगळून) कोणताही कबड्डी खेळाडु कबड्डी खेळापासुन वंचित राहाणार नाही यासाठी कटाक्षाने काळजी घेणे. (अर्थात संस्थेचे ते प्रथम /अनिवार्य कर्तव्य राहील) राज्यात अतिउच्च दर्जाचे कबड्डी खेळाडु तयार करणे. आणि संलग्न संस्थेच्या कार्यक्षेत्रातील कबड्डी खेळाचा / खेळाडुंचा व तत्सम घटकांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रथम प्राधान्याने जाणीवपुर्वक सर्वोतोपरी प्रयत्न करणे.
4. **संस्थेचे उद्देश :**

   अ. कबड्डी खेळाचा गावपातळी ते आंतरराष्ट्रीय पातळीवर विकास व प्रसार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. विविध स्तरावरील गावपातळी ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील कबड्डी खेळाच्या स्पर्धेसाठी मुला-मुलींचे संघ पाठविणे. व्यायाम शाळा चालविणे, गाव ते आंतरराष्ट्रीय पातळीवर कबड्डी खेळाबरोबरच खेळाडू, पंच, प्रशिक्षक, मार्गदर्शक, संघटक, नागरिक यांच्यासाठी परिसंवाद, उजळणी वर्ग, कार्यशाळा, चर्चासत्रे, व्याख्याने, प्रबोधन, सराव/प्रशिक्षण शिबीरे

आयोजित करणे व त्यांच्यात एकसुत्रीपणा आणणे. खेळाडूंच्या स्पर्धात्मक सहभागावर कटाक्षाने भर देणे.

ब. भारतीय ऑलम्पिक असोसिएशनच्या (IOA) व ॲमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया (AKFI) या राष्ट्रीय संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे राष्ट्रीय अजिंक्यपद व इतर स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याचे (विदर्भ वगळून) गटनिहाय (किशोर/किशोरी, कुमार/कुमारी व वरिष्ठ गट पुरुष/महिला व भविष्यात निर्माण होणारे कोणतेही गट) प्रातिनिधीक संघाची निवड करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी पाठवणे.

क. राज्य व केंद्र शासनाच्या विविध क्रीडा विषयक उपक्रमाची अंमलबजावणी करणे. क्रीडा क्षेत्रातील ईतर स्वायत संस्था उदा : महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन शालेय क्रीडा महासंघ (SGFI), विद्यापीठ क्रीडा मंडळ (AIU), खाजगी समुह किंवा तत्सम संस्था यांच्याशी कबड्डीच्या विकासासाठी समन्वय साधणे, प्रोत्साहन देणे, सहकार्य करणे.

ड. तरुणांमध्ये चारित्र्य व राष्ट्र निर्मितीची भावना निर्माण करणे, मादक द्रव्य (डोपिंग) व अल्पवयीन मुली / स्त्रियांच्या लैंगिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, युवक कल्याणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे शिवाय व्यसनमुक्ती अंधःश्रध्दा निर्मूलन, सामाजिक वनीकरण, दारुबंदी, स्त्री मुक्ती चळवळ, व्यक्तीमत्व विकास शिबीरे, नेतृत्व शिबीरे, निसर्गोपचार केंद्रे, क्रीडा विकासासाठी उपयुक्त व पूरक ठरणाऱ्या ग्रंथाची निर्मिती करून ग्रंथालय चालविणे आदी कार्यक्रम राबविणे.

इ. नैसर्गिक खेळ करून गुणवत्ता सिध्द करणाऱ्या खेळाडूंना व त्यांच्या घटक पक्षांना प्रोत्साहन देणे व अनैसर्गिक मार्गाचा अवलंब करून (उदा.डोपिंग, दहशत, सट्टेबाजी, गुणवत्तेमध्ये तडजोड करणे/Settlement) गुणवत्ता सिध्द करणाऱ्या खेळाडूंना / संघाला किंवा त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या घटकावर कडक शिस्तभंगाची कार्यवाही करणे आणि भविष्यातील असे गैरप्रकार रोखण्यासाठी प्रतिबंध उपाय राबवणे.

ई. निधी उपलब्धतेसाठी केंद्र / राज्य शासन व संस्थेच्या वतीने विविध योजना राबवणे, देशातील अथवा परदेशातील सेवाभावी संस्था/ निमशासकीय कार्यालय /

स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी समूह अथवा दानशूर व्यक्तीकडून देणगी घेणे किंवा जमा करणे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

उ. संस्थेचे कार्ये, जात, धर्म, वंश या पासून अलिप्त राहील. संस्थेचा सर्व कारभार मराठी भाषेतून चालेल, संस्थेच्या हितासाठी गरज भासल्यास हिंदी / इंग्रजी भाषेचा वापर केला जाईल.

**सुधारित ज्ञापन**

परिशिष्ट 'क'

# Maharashtra State Kabaddi Association

## महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई
## या संस्थेचे
## (सुधारित नियम व नियमावली)

## 1. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :

- **संस्था म्हणजे** - महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेस महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन / Maharashtra State Kabaddi Association / महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटना, MSKA म्हणजे Maharashtra State Kabaddi Association असे समजण्यात येईल. नियम व नियमावलीतील नियम क्र.10 व 12 प्रमाणे.
- **कबड्डी म्हणजे** - महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई (विदर्भ वगळून) असे समजण्यात येईल. यामध्ये मातीतील कबड्डी, मॅटवरील इनडोअर कबड्डी, बीच कबड्डी व सर्कल स्टाईल कबड्डी आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या कोणत्याही प्रकाराचा समावेश राहील.
- **सर्वसाधारण सभा** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई या संस्थेची सर्वसाधारण सभा / वार्षिक सभा / आम सभा / वार्षिक बैठक/ वार्षिक सर्वसाधारण सभा/ AGM - Annual General Meeting असे समजण्यात येईल.
- **कार्यकारी मंडळाची सभा** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यकारी मंडळाची सभा / कार्यकारिणी सभा / बैठक / नियामक मंडळ/ कार्यकारी समिती/ Governing Body/ECM - Executive Committee Meeting असे समजण्यात येईल.

- **राज्य कचेरी** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे, शिवाजी पार्क मैदान, वीर सावरकर मार्ग, दादर (प.) मुंबई-400028 येथील संस्थेचे कार्यालय असे समजण्यात येईल.
- **अध्यक्ष** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे अध्यक्ष /President असे समजण्यात येईल.
- **कार्याध्यक्ष** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे कार्याध्यक्ष / Chairman असे समजण्यात येईल.
- **वरिष्ठ उपाध्यक्ष** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे वरिष्ठ उपाध्यक्ष/ Senior Vice-President असे समजण्यात येईल.
- **उपाध्यक्ष** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे उपाध्यक्ष / Vice-President असे समजण्यात येईल.
- **सचिव** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे सचिव /महासचिव/ सरचिटणीस / सरकार्यवाह / प्रमुख कार्यवाह / सेक्रेटरी /Secretary/General Secretary असे समजण्यात येईल.
- **सहसचिव** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे सहसचिव / सहचिटणीस/सहकार्यवाह/ सहसेक्रेटरी / Joint Secretary असे समजण्यात येईल.
- **कोषाध्यक्ष** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे कोषाध्यक्ष/ खजिनदार / Treasurer असे समजण्यात येईल.
- **वार्षिक सर्वसाधारण सभेचे सभासद** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे / वार्षिक बैठकीचे सभासद, सदस्य, प्रतिनिधी, General Body Member असे समजण्यात येईल.

- **कार्यकारी मंडळाचे सभासद** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे कार्यकारी मंडळाचे / कार्यकारिणी सभेचे /बैठकीचे सभासद / सदस्य / Executive Committee Member असे समजण्यात येईल.
- **अजीवन विश्वस्त (Life Trustee) :** महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले महसूल जिल्हे (विदर्भ वगळून)
- **जिल्हा असोसिएशनचे प्रतिनिधी** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे जिल्हा असोसिएशनचे प्रतिनिधी / सदस्य/ सभासद/ District Representative (DR)/ District Member (DM) / जिल्हा असोसिएशनचा कार्यकर्ता असे समजण्यात येईल.
- **पदाधिकारी** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाचे सर्व पदाधिकारी/सदस्य किंवा Office Bearer/Executive Member असे समजण्यात येईल.
- **सभाध्यक्ष** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या कार्यकारी मंडळ व सर्वसाधारण सभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुसवणाऱ्या / स्वीकारणारी व्यक्ती.
- **आयोग** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मध्ये नमूद केलेले आयोग/उपसमितीचे पदाधिकारी/सदस्य / प्रतिनिधी / कार्यकर्ता असे समजण्यात येईल.
- **खेळाडू आयोग** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे अतिउच्च कामगिरी करणारे माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू / खेळाडू समिती मधील नोंदणीकृत पात्र खेळाडू/ Athlete Commission / Sportsman of Outstanding Merit (SOM)असे समजण्यात येईल. (राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील तरतूद)
- **स्थानिक संस्था** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई अंतर्गत कबड्डी खेळाचे प्रशिक्षण देण्यास ईच्छूक असणाऱ्या स्थानिक संस्था/मातृ संस्था/ क्रीडा मंडळे/

क्लब/ सेवाभावी संस्था/व्यायाम शाळा/Sports Academy इ. असे समजण्यात येईल. ज्या BPT Act 1860 व 1950 अंतर्गत धर्मदाय नोंदणीकृत झालेल्या / केलेल्या कोणत्याही संस्था/ट्रस्ट.

- **अजीव सभासद** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचा अजीव सभासद/अजीव सदस्य / Life Member असे समजण्यात येईल.
- **अजिव आश्रयदाते** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे आश्रयदाते / Life Patron असे समजण्यात येईल.
- **मुख्य आश्रयदाते** - म्हणजे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, मुंबई या संस्थेचे मुख्य आश्रयदाते / Chief Patron असे समजण्यात येईल.

## 2. कार्यक्षेत्र :

या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य (विदर्भ वगळून) असे मर्यादित राहील व ही संस्था भारत / महाराष्ट्र शासन, भारतीय / महाराष्ट्र ऑलम्पिक असोशिएशन / संघटना (IOA/MOA) व ॲमॅच्युअर कबड्डी फेडरेशन व ऑफ इंडिया (AKFI) या संस्थेशी संलग्नित राहून कबड्डी खेळाचा प्रसार व प्रचार महाराष्ट्र राज्यात (विदर्भ वगळून) करेल.

## 3. हिशोबाचे वर्ष :

या संस्थेचे हिशोबाचे वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे मर्यादित राहील.

## 4. सभासदांचे प्रकार व वर्गणी /संलग्नता फी :

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | सलग्न जिल्हा असोसिएशन (अजीवन विश्वस्त) | रु. 2000/- | प्रति वर्ष 31 मार्चच्या आत 2000/- रु. भरणा करून वार्षिक नूतनीकरण करणे अनिवार्य आहे. नवीन जिल्हा संघटनेला प्रथम संलग्नीकरण देताना प्रवेश शुल्क म्हणून 10000/- रु. आकारले जातील. |
| ब) | खेळाडू आयोग | रु. 500/- | नियुक्त चार वर्षाच्या कालावधीत एकदाच घेतली जाईल. |
| ब) | अजीव सभासद | रु.10000/- | एकदाच घेतली जाईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| क) | अजिव आश्रयदाते | रु. 100000/- | एकदाच घेतली जाईल. |
| टीप : | सर्व प्रकारची शुल्क / फी मध्ये कमी अधिक बदल करण्याचा अधिकार कार्यकरी मंडळाला राहील. केलेल्या बदलास वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे अनिवार्य राहील. झालेला बदल सर्वांना बंधनकारक राहील. (केलेला बदल एक वर्षानंतर प्रत्यक्षात अंमलात आणला जाईल.) | | |

## 5. जिल्हा असोसिएशन व त्याची रचना/ नोंदणी पध्दत

राज्य असोसियशनचे अजीवन विश्वस्त / Trustee म्हणुन महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले महसुल जिल्हे राहातील. (विदर्भ वगळून)

'एक खेळ, एक संस्था' या तत्वाचे पालन करून जिल्हा संघटनेची धर्मदाय कार्यालयात नोंदणी करण्यापुर्वी खालील नियम व अटीची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.

1) जिल्ह्यातील BPT Act 1860 व 1950 अन्वये सहायक धर्मदाय कार्यालयात नोंदणी केलेल्या संस्था जिल्हा संघटनेला सलग्न असणे अनिवार्य राहातील. पात्र स्थानिक संस्थांनी मागणी केल्यास संलग्नीकरण देणे जिल्हा संघटनेला बंधनकारक राहील.

2) सलग्न स्थानिक संस्था किंवा तत्सम नोदणीकृत संस्था जी कब्बडी खेळाचे दररोज प्रशिक्षण देवुन उच्च दर्जाचे कब्बड्डी खेळाडु तयार करण्यासाठी प्रयत्नशील / कटिबध्द आहेत. तसेच जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत सलग चार वर्षे किमान 50% सहभाग घेतील. उदा- 6 गटापैकी कोणत्याही किमान 3 गटात सहभाग घेणे अनिवार्य राहील. (किशोर/कुमार/वरिष्ठ गट किंवा भविष्यात निर्माण होणारे कोणतेही गट यात समाविष्ट होतील) अशाच स्थानिक संस्थेचा जिल्ह्याच्या सलग्नीकरणासाठी विचार केला जाईल व त्यांनाच मतदानाचा अधिकार प्राप्त होईल. ज्या स्थानिक संस्था हा नियम पाळणार नाहीत अशा स्थानिक संस्थांना पचंवार्षिक निवडणुकीत मतदानाचा हक्क राहाणार नाही. मात्र आपले संघ स्पर्धेत सहभागी करता येतील. (मतदानाचा वंचित कालावधी हा त्या निवडणुकीपुरताच मर्यादित राहील.)

3) नवीन जिल्ह्याची निर्मिती झाल्यास, राज्य संघटना प्रसिद्धी पत्रकाव्दारे तात्काळ जाहिर प्रगटन करुन, नवीन जिल्ह्यात संघटना स्थापन करण्याबाबत स्थानिक संस्थांना / कबड्डी प्रेमीना कळवेल. त्यानंतर कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेली

त्रिसदस्यीय समिती अशा जिल्हाचा प्रत्यक्ष दौरा करुन, प्रत्येक तालुक्यातील एका ईच्छुक व योग्य व्यक्तीची निवड करुन कमीत कमी 7 किंवा जास्तीत जास्त जिल्ह्यात जेवढे तालुके असतील तेवढ्या सदस्याची अस्थायी समिती गठित करेल. सदरील नियुक्त केलेली अस्थायी समिती राज्य स्पर्धेत संघ सहभागी होण्याच्या दृष्टीने जिल्हा संघाची निवड करतील. त्याच बरोबर राज्य संघटनेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जिल्हा संघटना स्थापन करण्यासाठी प्रयत्नशील राहातील. अस्थायी समितीचा कालावधी हा 6 महिन्या पेक्षा जास्त असणार नाही. या कालावधीतच अस्थायी समितीला परिपुर्ण अशा जिल्हा संघटनेची स्थापना करणे बंधनकारक राहील. या कालावधीत राज्य संघटनेच्या कार्यकारी मंडळातील एक तज्ञ पदाधिकारी अस्थायी समितीचा प्रशासक म्हणुन नियुक्त केला जाईल.

राज्य संघटनेच्या घटनेतील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जिल्हा संघटनेची स्थापना करणे किंवा अस्थायी समितीला वेळोवेळी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी प्रशासकाची राहील. नवनिर्वाचित जिल्ह्यातील खेळाडू हा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या कोणत्याही उपक्रमापासून वंचित राहणार नाही यासाठी प्रथम प्राधान्याने कार्यवाही करणे अनिवार्य राहील राज्य संघटनेचे ते आद्य कर्तव्य राहील.

4) राज्य संघटनेच्या ध्येय धोरणानुसार जिल्हा संघटनेची धर्यदाय कार्यालयात रितसर नोंदणी झाली की, कार्यकारी मंडळाच्या शिफारशीवरुन सर्वसाधारण सभेत बहुमताने सलग्नीकरण दिले जाईल. राज्य संघटनेनी विहित केलेली सलग्नता फी निर्धारित वेळेत भरणा केल्यानंतर त्यांची सभासद नोंदणी रजिस्टरमध्ये नोंद केल्या जाईल. त्यानंतरच सदरील जिल्हा राज्य संघटनेचा अधिकृत सलग्नित जिल्हा म्हणुन घोषित केला जाईल.

5) राज्य संघटनेनी वेळोवेळी निश्चित केलेली वार्षिक सलग्नता फी / शुल्क 31 मार्च च्या अगोदर जिल्हा संघटनेनी दरवर्षी ऑनलाईन पध्दतीने MSKA च्या अधिकृत बँक खात्यात भरणा करुन, नुतनीकरण करणे अनिवार्य राहील. जी संस्था वार्षिक

नुतनीकरण करणार नाही अशा जिल्हा संघटनेला चौवार्षिक निवडणुकीपुर्वी सदरील रक्कम संस्थेच्या बँक खात्यात चेकव्दारे किंवा RTGS व्दारे भरणा करावी लागेल. जी संघटना या रक्कमेचा भरणा करणार नाही, अशा जिल्हा संघटनेला चौवार्षिक निवडणुकीत सहभाग घेता येणार ( असे जिल्हे पद व मतदानापासुन वंचित राहातील)

6) महाराष्ट्र राज्याच्या कार्यक्षेत्रातील कोणताही खेळाडु कब्बड्डी खेळापासुन वंचित राहाणार नाही. या राज्य संघटनेच्या तत्वप्रणालीनुसार जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत नियम व अटीच्या आधीन राहुन कोणतेही हौशी कबड्डी खेळाडु किमान 10 व कमाल 14 जण एकत्र आल्यास आणि त्यांनी निर्धारित केलेली स्पर्धा शुल्क भरल्यास अशा संघाला "**बिगर नोंदणीकृत संघ**" म्हणुन स्पर्धेत सहभाग देणे अनिवार्य राहील. गुणवत्ता व पात्रताधारक योग्य खेळाडुंची जिल्हा संघात निवड करणे जिल्हा संघटनेला बंधनकारक राहील. **'बिगर नोंदणीकृत संघ'** म्हणुन तालुक्यातील / प्रभाग / वार्ड/ शाळा /महाविद्यालय/शासकीय/निम शासकीय कार्यालयातील पात्र संघाना स्पर्धेत प्रवेश दिला जाईल. (अशा बिगर नोंदणीकृत संघाना जिल्हा संघटनेच्या कामकाजात कसलाच हस्तक्षेप करता येणार नाही किंवा मतदान प्रक्रियेत सहभाग / हक्क राहाणार नाही. अशा संघाचे अस्तित्व फक्त स्पर्धेपुरतेच मर्यादित राहील.)

अ ) जिल्ह्यातील कोणत्याही स्थानिक संस्थेला असे खेळाडु सलग्न किंवा नोदणीकृत असु नयेत. अशाच खेळाडुंना बिगर नोंदणीकृत संघाकडुन खेळता येईल. (एखाद्या खेळाडूने स्थानिक संस्थेचा राजिनामा दिल्यानंतर एक वर्षानंतर बिगर नोंदणीकृत संघाकडून खेळता येईल.)

ब) बिगर नोंदणीकृत संघात फक्त तालुक्यातील / प्रभाग / वार्डातील रहिवाशी किंवा शाळा/ महाविद्यालय/शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील खेळाडुच खेळु शकतील.इतर खेळाडूना अशा बिगर नोंदणीकृत संघाकडून खेळता येणार नाही.

क) जिल्हा असोसियशनला सलग्न असलेल्या स्थानिक संस्थेला बदली खेळाडुचा नियम  लागू राहील. यासाठी त्यांनी जिल्हा असोसियशनची पुर्व मान्यता घेणे अनिवार्य राहील. (अशा खेळाडूंना राजिनामा दिल्यानंतर एक वर्षानंतर जिल्हा निवड चाचणीत सहभाग घेता येईल.) संलग्न खेळाडूंना नाहरकत प्रमाणपत्र (NOC) आठ दिवसाच्या आत देणे. स्थानिक संस्थेला बंधनकारक / अनिवार्य राहील. जर देण्यास जाणीवपूर्वक विलंब / टाळाटाळ केली तर सदरील खेळाडू जिल्हा / राज्य संघटनेकडे दाद मागू शकतील.

7) जिल्हा संघटना स्थापन झाल्यानंतर जर एखाद्या नोंदणीकृत स्थानिक मंडळाने सलग्नीकरणासाठी अर्ज केल्यानंतर, ज्या मंडळाने किमान चार वर्ष जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत (06) सहा पैकी किमान तीन गटात (50 टक्के) सहभाग घेतला आहे. अशाच नोंदणीकृत स्थानिक मंडळाला नियम व अटीच्या आधीन राहुन सलग्निकरण दिले जाईल.

8) राज्य संघटनेला ज्या जिल्हा संघटना सलग्न आहेत, अशा जिल्हा संघटनेनी या नवीन घटनेत नमुद केलेल्या रचनेप्रमाणे आप - आपल्या जिल्ह्याच्या घटनेत बदल करुन घेणे अनिवार्य / बंधनकारक राहील.

ज्या जिल्हा संघटना वारंवार सुचना / ताकीद देवून ही घटनेत बदल करणार नाहीत, अशा जिल्हा संघटनेचे सलग्नीकरण कार्यकारी मंडळ व सर्व साधारण सभेच्या बहुमताने कायमचे रद्द केले जाईल.

सलग्नीकरण रद्द केलेल्या अशा जिल्ह्यात राज्य संघटना त्वरित अस्थायी समिती (नियम क्र. 5 - 3 प्रमाणे ) नियूक्त करेल.

फक्त याच कारणामुळे जिल्हा संघटनेचे सलग्नीकरण रद्द करता येईल.

9. AKFI ला संलग्न असलेल्या ज्या घटक संस्थेचे संघ राष्ट्रीय स्पर्धेत स्वतंत्र सहभागी होतात (उदा.रेल्वे, सेनादल इत्यादी) अशा कोणत्याही व्यक्तीला उदा.खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक, निवड समिती सदस्य किंवा पदाधिकारी

इत्यादींना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या कोणत्याही उपक्रमात समाविष्ट करून घेतले जाणार नाही.

10. नियम क्रमांक 5 मधील 1 ते 9 उपनियमात बदल करण्याचा अधिकार राहणार नाही. केवळ केंद्र व राज्यशासनाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अधिनस्त राहून यामध्ये बदल करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला राहील.

## 6. आजीव सदस्य व त्यांची नोंदणी पध्दत :

भारताचे व महाराष्ट्र राज्याचे नागरिकत्व असलेला ज्याचे वय 18 वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कोणत्याही व्यक्तीस या संस्थेचे आजीव सदस्य होता येईल. त्यासाठी त्यांना संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने बहुमताने मंजुरी दिल्यास, आणि सदर व्यक्तीने संस्थेची विहीत केलेली 10000 रु. (दहा हजार) वर्गणी फी दिल्यानंतर त्याची नोंद संस्थेच्या आजीव सभासद रजिस्टरमध्ये करण्यात येईल. आजीव सदस्य फी फक्त एकदाच घेतल्या जाईल.

## 7. आजीव आश्रयदाते व त्यांची नोंदणी पध्दत :

भारताचे व महाराष्ट्र राज्याचे नागरिकत्व असलेले ज्याचे वय 18 वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कोणत्याही व्यक्तीस या संस्थेचे आजीव आश्रयदाते होता येईल. त्यासाठी त्यांना संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाला कार्यकारी मंडळाने बहुमताने मंजुरी दिल्यास, आणि सदर व्यक्तीने संस्थेची विहीत केलेली 100000 रु. (एक लाख रु.) वर्गणी फी दिल्यानंतर संस्थेच्या आजीव आश्रयदाते रजिस्टरमध्ये त्यांचे नोंद करण्यात येईल. फी एकदाच घेतली जाईल.

## 8. सभासदत्व रद्द होणे :

कार्यकारी मंडळातील कोणताही सभासद कायदेशीर गुन्हेगार ठरला असेल, सभासदाने वर्गणी दिली नसेल, मरण पावला असेल, देश सोडून परदेशात गेला असेल, व्यसनी झाला असेल, संस्थेस नुकसान पोहोचवित आहे, असे निदर्शनास आल्यास किंवा अन्य दखलपात्र कारणाने कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजूर करुन काढून टाकल्यास त्याचे सभासदत्व कायमचे रद्द झाले असे समजण्यात येईल. (ही कार्यवाही करण्यापूर्वी

कार्यकारी मंडळाला सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.) जिल्हा असोसिएशनचे सभासदत्व रद्द करता येणार नाही. (नियम क्र.5-9 नुसार अपवादात्मक परिस्थितीत जिल्हा संघटनेचे संलग्नीकरण रद्द केले जाईल) काही वाद निर्माण झाल्यास अशा जिल्ह्यात अस्थायी समिती नेमून वाद मिटेपर्यंत प्रशासकीय कामकाज चालविले जाईल. मात्र अस्थायी समितीचा कालावधी हा सहा (06) महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये. कार्यकारी मंडळ तक्रार निवारण समितीची नेमणूक करून जिल्ह्यात निर्माण झालेला वाद मिटवेल. (जिल्हा प्रतिनिधी व खेळाडू आयोगातील व्यक्ती / खेळाडूचे सभासदस्यत्व चार वर्षाचा कालावधी संपताच कुठलीही सूचना न देता आपोआप संपुष्टात येईल / रद्द होईल.

## 9. सर्वसाधारण सभा तिचे अधिकार आणि कार्य :

कधीही बरखास्त न होणारी सभा म्हणजे सर्व साधारण सभा होय. संस्थेची सर्वश्रेष्ठ आणि शेवटचा व अंतिम निर्णय देणारी ही सभा राहील. या सभेचे अजीवन विश्वस्त/ TRUSTEE/ GBM - General Body Member म्हणुन महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले महसुल जिल्हे (विदर्भ वगळून) राहातील.

संलग्न जिल्ह्याचे नामनिर्देशन केलेले तीन प्रतिनिधी राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील तरतूदीप्रमाणे खेळाडू आयोगातील पात्र चार खेळाडू (दोन पुरुष व दोन महिला) या सभेच्या प्रत्यक्ष निर्णायक कामकाजात वार्षिक सभेचे जिल्हा प्रतिनिधी म्हणुन नियुक्त कालावधी (04) चार वर्षापर्यंत काम पहातील. नियुक्त केलेला कालावधी संपताच जिल्हा प्रतिनिधी व खेळाडू आयोगातील पात्र खेळाडूंचे) सदस्यत्व / अस्तित्व कुठलीही सूचना न देता आपोआप संपुष्टात येईल/रद्द होईल.

कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यावर नियंत्रण ठेवणे, चौवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम राबविणे, विशेष सर्व साधारण सभा आयोजित करुन कार्यकारी मंडळाची निवड करणे, वार्षिक हिशोब मंजुर करणे, पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे, लेखा परिक्षकाची नेमणुक करणे, कार्यकारी मंडळाने शिफारस केलेल्या नवीन जिल्हा

संघटनेला सलग्निकरण देणे, संस्थेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार नावात / उद्देशात तसेच नियम व नियमावलीत बदल करणे, संस्थेचे हित जोपासण्यासाठी आवश्यकता वाटल्यास उपसमित्यांची निवड करणे,याशिवाय संस्थेच्या हिताचे ईतर सर्व कामे आवश्यकतेनुसार करणे किंवा निर्णय घेणे / देणे, आर्थिक वर्ष संपताच माहे तीन महिन्याच्या आत सर्व साधारण सभा घेणे बंधनकारक राहील.( केंद्र व राज्य सरकारने जाहीर केलेल्या आपत्तीकाळात हा नियम शिथिल राहील).

वार्षिक सर्व साधारण सभेचे सभाध्यक्ष / अध्यक्षस्थान कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भुषवतील त्यांच्या गैरहजरीत कार्याध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, उपाध्यक्ष (गुणानुक्रमे) काम पहातील. यापैकी कोणीच हजर नसेल तर उपस्थित सदस्यापैकी बहुमताने कोणात्याही एका सदस्याची सभाध्यक्ष म्हणुन निवड केली जाईल. त्यानंतर सभेचे कामकाज सुरु होईल. ही सभा वर्षातुन एकदाच घेतली जाईल. बहुमताच्या प्रक्रियेत समान मते पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार सभाध्यक्षास राहील.

1) संस्थेच्या हिताचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे सर्वोच्च अधिकार या सभेला आहेत. त्यामुळे सलग्न जिल्हा संघटनेच्या पात्र प्रतिनिधीनी वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहणे अनिवार्य राहील. पंच वार्षिक निवडणुकीसाठी जिल्हा संघटनेनी नामनिर्देशित केलेले तीन (03) प्रतिनिधी व खेळाडू समितीमधील चार (04) प्रतिनिधी वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकृत सदस्य म्हणुन ग्राह्य धरल्या जातील. याच सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निर्णय प्रक्रियेत अधिकृत भाग घेण्याचा अधिकार राहील.

   या सभेला सलग दोन वेळा गैरहजर राहाणाऱ्या सदस्याला दंड म्हणून AGM च्या पुढील दोन बैठकीसाठी अपात्र ठरविले जाईल. मा.अध्यक्ष, कार्याध्यक्ष व वरिष्ठ उपाध्यक्ष यांना वगळून उर्वरित सर्व पदाधिकारी व सदस्यांना उपस्थितीचा नियम लागू राहील. परंतु उर्वरीत सर्व प्रशासकीय कामकाज करण्याचा अधिकार अपात्र ठरविलेल्या सदस्यांना राहील.

2) सर्वसाधारण सभेच्या बैठकीला उपस्थित राहाण्याचा अधिकार अजीव सभासदांना राहील. अजिव सभासदांना ई- मेल व्दारे वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आवश्यक असणारा सर्व दस्ताऐवज किमान पंधरा (15) दिवस अगोदर पाठवणे अनिवार्य राहील. असे सभासद सभेला उपस्थित राहुन लेखी किंवा प्रत्यक्ष मार्गदर्शक सुचना किंवा कामकाजातील त्रुटी निर्देशनास आणुन देवू शकतील. मात्र या सुचना अंमलात आणणे राज्य संघटनेला बंधनकारक राहाणार नाहीत.

यासाठी सभेच्या प्रारंभीच्या वेळेत एक तासाचा अवधी अजीव सभासदांना सर्व पदाधिकारी / जिल्हा प्रतिनिधी यांच्या समवेत चर्चा करण्यासाठी दिला जाईल.

एक तासाचा अवधी संपताच सर्व अजीव सभासद सभागृहाच्या बाहेर जातील आणि त्यांनतरच वार्षिक सभेसाठी नामनिर्देशित केलेले अधिकृत जिल्हा प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत निर्णायक सभेला प्रारंभ होईल.

## 10. सर्व साधारण सभेची सूचना व गणसंख्या :

सर्वसाधारण सभेची सूचना किमान 15 दिवस अगोदर संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सूचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय आदी नमूद करणे आवश्यक राहील. सूचना सर्व सदस्यांना संस्थेच्या डाक बुकात/सूचना वहीत सही घेऊन अथवा शासकीय टपालाद्वारे पाठविण्यात येईल, जिल्हा संघटनेच्या अधिकृत ई-मेल द्वारे कळविणे अनिवार्य राहील. किंवा कार्यकारी मंडळ पत्रव्यवहाराची जी पध्दत ठरवेल ती सर्वांना बंधनकारक राहील मात्र या बदलाची मंजुरी सर्वसाधारण सभेत घेणे अनिवार्य राहील. सर्वसाधारण सभेसाठी 2/3 (पुर्णांक संख्येत) सभासद उपस्थित झाल्यास / राहिल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजण्यात येईल. सर्व जिल्हा प्रतिनिधीला लेखा विवरणपत्र (ऑडीट) सभेच्या परिपत्रकासोबत पाठविणे अनिवार्य राहील.

**टीप** :- सभेच्या ठरलेल्या वेळापासून 15 मिनीटापर्यंत गणसंख्या भरु शकली नाही, तर अशी सभा तहकूब केली जाईल तहकूब सभेच्या वेळेपासून अर्ध्या तासांनी सुरु होईल. (तारीख, वेळ, ठिकाण व विषय तेच राहतील) अशाप्रकारे तहकूब होऊन सुरु झालेल्या

सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. अशा सभेत घेतलेले सर्व निर्णय अधिकृत समजल्या जातील.

## 11. विशेष सर्व साधारण सभा : तिचे अधिकार व कार्ये :

अशी सभा १५ दिवस अगोदर सुचना देवुन आवश्यकतेनुसार केंव्हाही घेता येईल. जी कार्ये करण्याचा अधिकार सर्व साधारण सभेला आहे. ती सर्व कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्व साधारण सभेला राहील.

अशा सभेत विषय पत्रिकेत नमुद कामकाजाचाच केवळ विचार करुन निर्णय घेतला जाईल. अपत्तकालीन परिस्थिती मध्ये एखादा निर्णय त्वरित / तात्काळ घेणे संस्थेच्या हिताचे ठरत असेल तर अशा परिस्थितीत अध्यक्षाची परवानगी घेवुन, सचिव किमान 24 तासाची अल्प सुचना ई-मेलव्दारे देवुन तातडीची विशेष सर्वसाधारण सभा (ऑनलाईन/प्रत्यक्ष) बोलावु शकतील. (मात्र संबधित सर्व सदस्यांना दुरध्वनीव्दारे/व्हाट्सअपद्वारे वैयक्तिक संपर्क साधण्याची जबाबदारी सचिवाची राहील.)

या सभेसाठी 2/3 (पुर्णांक संख्येत) सभासद उपस्थित झाल्यास / राहिल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यात येईल.

**टिप** :- सभेच्या ठरलेल्या वेळेपासुन 15 मिनिटापर्यंत गणसंख्या भरु शकली नाही तर सभा तहकुब केली जाईल. अशी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयावर तहकुब सभेच्या वेळेपासुन अर्ध्या तासानी सुरु होईल. अशा प्रकारे तहकुब होवून सुरु झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही. (तातडीच्या ऑनलाईन बैठकीसाठी गणसंखे अभावी तहकूब झालेली सभा निर्धारित वेळेच्या 5 मि. नंतर सुरु होईल.)

## 12. संस्थेचे कार्यकारी मंडळ पदाधिकारी व त्यांची रचना :

संस्थेचे कार्यकारी मंडळ 15 सदस्यांचे राहील त्याची रचना खालील प्रमाणे राहील -

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | प्रवर्ग | निकष |
|---|---|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | 1 | खुला | संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येतील. |
| 2 | कार्याध्यक्ष | 1 | खुला | संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येतील. |
| 3 | वरिष्ठ उपाध्यक्ष | 1 | खुला | संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येतील. |
| 4 | उपाध्यक्ष | 5 | -- | अ) दोन पदे खुला गटराखीव<br>ब) एक पद महिला राखीव<br>अ आणि ब गटातील पदाची निवड संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येईल.<br>------------------------------------------------------<br>क) एक पद अतिउच्च गुणवत्ताधारक पुरुष खेळाडूसाठी राखीव<br>ड) एक पद खेळाडू समितीमधील महिला खेळाडूसाठी राखीव<br>क आणि ड गटातील पदाची निवड बिनविरोध/थेट करण्यात येईल. |
| 5 | सचिव | 1 | खुला | संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येईल. |
| 6 | सहसचिव | 5 | - | अ) दोन पदे खुला गटराखीव<br>ब) एक पद महिला राखीव<br>अ आणि ब गटातील पदाची निवड संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येईल.<br>------------------------------------------------------<br>क) एक पद अतिउच्च गुणवत्ताधारक महिला खेळाडूसाठी राखीव<br>ड) एक पद खेळाडू समितीमधील पुरुष खेळाडूसाठी राखीव<br>क आणि ड गटातील पदाची निवड बिनविरोध/थेट करण्यात येईल. |
| 7 | खजिनदार | 1 | खुला | संपूर्ण राज्यातून (विदर्भ वगळून) निवड प्रक्रियेद्वारे निवडण्यात येईल. |
| | **टिप :-**<br>1) खुला प्रवर्ग म्हणजे पुरुष किंवा महिला यापैकी कोणीही.<br>3) कार्यकारी मंडळात किमान चार महिला असणे अनिवार्य आहे.<br>2) खेळाडू आयोगातील उपाध्यक्ष व सहसचिव पदाचे आरक्षण चक्राकार/ रोस्टर पध्दतीने दर चौवार्षिक निवडणुकीपूर्वी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बदल करणे अनिवार्य राहील | | | |

## 13. कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ, निवडणुकीची पध्दत व मतदानाचा अधिकार :

कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ चार (04) वर्षाचा राहील. चार वर्ष पुर्ण होण्याअगोदर चौवार्षिक निवडणुक घेणे बंधनकारक राहील. (केंन्द्र व राज्य सरकार ने जाहीर केलेल्या आपत्ती काळात हा नियम शिथील राहील.) कालावधी संपल्यानंतरच्या दुसऱ्या दिवसापासून नवीन कार्यकारी मंडळ अस्तित्वात आले पाहिजे.

निवडणुक सर्व सभासदाच्या बहुमताने हात उंचावुन घेतली जाईल.किंवा एकाद्या मतदाराने / सभासदाने मागणी केल्यास गुप्त मतदान पध्दतीने विशेष सर्वसाधारण सभेत दर चार वर्षानंतर घेण्यात येईल.

कार्यकारी मंडळाचा कालावधी संपण्यापूर्वी होणाऱ्या शेवटच्या सर्व साधारण सभेत चौवार्षिक निवणुकीचा कार्यक्रम किमान 45 दिवस अगोदर जाहीर करणे अनिवार्य राहील. यामध्ये मतदानाची तारीख, ठिकाण व निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल.

सभेला उपस्थित असणारे सदस्य बहुमताने कायद्याची पदवी प्राप्त तज्ञाची निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन नियुक्ती करतील. (राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील तरतूद) सर्व साधारण सभेच्या बहुमताने नियुक्त केलेल्या या निवडणुक निर्णय अधिकाऱ्याला निर्णय घेण्याचे संपुर्ण (स्वायत्त )अधिकार प्राप्त होतील. यामध्ये कोणालाही हस्तक्षेप करता येणार नाही. याच अधिकाऱ्याच्या निंयत्रणाखाली निवडणुक प्रक्रिया पुर्ण केली जाईल.

या अधिकाऱ्याने दिलेला निर्णय सर्वांनाच बंधनकारक राहील. निवडणुक प्रक्रियेत समान मत पडल्यास नाणेफेक करुन निर्णय देण्याचा अधिकार निवडणुक अधिकाऱ्याला राहील.

**चौवार्षिक निवडणुक कार्यक्रम**

1) राज्य संघटनेच्या चौवार्षिक निवडणुकीसाठी सलग्न जिल्हा संघटनेने नामनिर्देशित केलेल्या तीन प्रतिनिधीना मतदानाचा अधिकार / हक्क राहील. (वयाची 25 वर्षे पूर्ण केलेले)

या तीन प्रतिनिधी मध्ये (दोन खुला गट व एक महिला राखीव राहील) कार्यकारी मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभेचे सभासद/मतदार यापैकी कोणाचेही नामनिर्देशन करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. या तीन प्रतिनिधीमध्ये सचिवाचे नाव व एक महिला प्रतिनिधी अनिवार्य राहील. वैयक्तिक कारणास्तव सचिव जाण्यास असमर्थ असेल तर त्यांच्या ऐवजी दुसऱ्या कोणत्याही पात्र सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. मात्र याकरिता सचिवाचे नाहरकत/संमतीपत्र असणे अनिवार्य राहील.

2) या तीन जिल्हा प्रतिनिधीचे नावे जिल्हा संघटनेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत बहुमताने ठराव घेवुन, सचिवाच्या स्वाक्षरीने लेटर हेड वर ठरावाच्या सत्यप्रतीसह, राज्य संघटनेकडे निर्धारित वेळेत अधिकृत ई-मेल वर पाठविणे अनिवार्य राहील.त्यानंतर शासकीय टपालाने किंवा प्रत्यक्ष राज्य कचेरीत पाठवुन द्यावेत. ई-मेल वर निर्धारित वेळेत पाठवलेली नावे अधिकृत / ग्राह्य समजल्या / धरल्या जातील.

अ) जिल्हा कार्यकारी मंडळाच्या बहुमताने मान्य केलेली तीन नावेच अधिकृत समजल्या जातील.

ब) जिल्हा कार्यकारिणीने बहुमताने मान्य केलेले नावेच राज्य संघटनेकडे पाठविणे सचिवाला बंधनकारक / अनिवार्य राहतील.

क) तीन प्रतिनिधीची नावे राज्य संघटनेकडे नामनिर्देशित करताना जिल्हा संघटनेत काही वाद किंवा तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास राज्य संघटना यामध्ये हस्तक्षेप करून योग्य तो न्याय निवाडा करेल. (जिल्हा कार्यकारिणीच्या बहुमताचा निर्णयच अंतिम राहील.)

ड) राज्य संघटनेच्या परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे चौवार्षिक निवडणुकीसाठी सलग्न जिल्हा संघटनेनी निर्धारित वेळेत पाठवलेली तीन (03) नावेच चार वर्षाचा कार्यकाळ पुर्ण करतील. जिल्हा संघटनेनी राज्य संघटनेकडे नावे पाठवली की, त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत अदला - बदल करता येणार

नाही. पाठवलेल्या नावामध्ये एखाद्या सदस्याने स्वतःहून राजिनामा दिलेला असेल, एखादा सदस्य मृत्यु पावला असेल किंवा न्यायालयाने दोषी ठरवून त्याला शिक्षा झालेला असेल तरच त्या नावात बदल केला जाईल. या बदल्यात कार्यकारिणीतील दुसरे नाव पाठवण्याचा अधिकार संबधित जिल्हा संघटनेला राहील. (चार वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला की जिल्हा प्रतिनिधीचे अस्तित्व / अधिकार कुठलीही सूचना न देता आपोआप संपुष्टात येईल.)

ग. राज्य संघटनेच्या चौवार्षिक निवडणुकीसाठी तीन प्रतिनिधीची नावे नामनिर्देशित करण्यासाठी कार्यकारी मंडळातील पदाधिकारी, सदस्य किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेचे सदस्य / मतदार पात्र राहतील.

3) चौवार्षिक निवडणुक प्रक्रियेसाठी 25 जिल्ह्याचे तीन प्रतिनिधी म्हणजे 25 × 3 = 75 आणि खेळाडू आयोगातील 4 (चार) सदस्य (75+4) असे एकूण 79 मतदार चौवार्षिक निवडणुकीसाठी मतदार म्हणून पात्र राहतील. (नवीन जिल्ह्याची निर्मिती झाल्यास या संख्येत बदल होऊ शकेल)

अ) नियम क्र. 18- ब ची पुर्तता करण्यासाठी गरज भासल्यास या मतदाराना पुनशः मतदानाचा व उमेदवारी अर्ज करण्याचा हक्क प्राप्त होईल.

4) जिल्हा प्रतिनिधीची तीन नावे पाठवताना ती व्यक्ती जिल्हा वार्षिक सर्वसाधारण सभेचा मतदार असणे अनिवार्य राहील. अन्यथा बाहेरील पाठवलेल्या प्रतिनिधीला निवडणुकीमध्ये अपात्र ठरविल्या जाईल.

5) राज्य संघटनेच्या निवडणुकीपुर्वी सलग्न जिल्हा संघटनेची निवडणुक प्रक्रिया पुर्ण करणे अनिवार्य /बंधनकारक राहील. या नव्या कार्यकारणीतील तीन नावेच राज्य संघटनेच्या चौवार्षिक निवडणुकीसाठी पाठवणे अनिवार्य राहील.

6) राज्य संघटनेच्या निवडणुकीमध्ये निवडुण आलेले पदाधिकारी चार वर्षाचा कालावधी पुर्ण करतील. एखादे वेळेस राज्य कार्यकारणीत निवडून आलेला पदाधिकारी काही कारणास्तव स्वतःच्या जिल्ह्यात पराभुत झाला असेल / बडतर्फ

केला असेल किंवा अन्य कारणाने त्याचे अस्तित्व संपुष्टात आले तर अशा पदाधिकाऱ्याना जिल्हा संघटनेच्या मागणीवरुन राज्य संघटनेच्या कार्यकारणीतुन पदच्युत /बडतर्फ केले जाणार नाही. (बडतर्फीचे कारण केलेला गुन्हा गंभीर व त्यास न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा दिलेली असेल तर राज्य संघटना याबाबत राज्य कार्यकारणी मध्ये स्वनिर्णय घेईल.)

7) एक उपाध्यक्ष व एक सहसचिव पद महिला साठी राखीव राहील. उपरोक्त पदाच्या व्यतिरिक्त कार्यकारिणीतील इतर कोणत्याही खुल्या प्रवर्गातील पदासाठी राज्यातील संलग्न (विदर्भ वगळुन) जिल्ह्याने नामनिर्देशित केलेल्या महिला प्रतिनिधी उमेदवारी अर्ज भरू/करु शकतील. यासाठी 79 मतदार त्यांना मतदान करतील.

8) कार्यकारी मंडळातील काही कारणास्तव रिक्त झालेली जागा उर्वरित कार्यकारी मंडळाचे बहुमताने भरता येईल. 3/4 पदाधिकाऱ्यानी राजिनामे दिले किंवा अन्य कारणाने बारा (12) किंवा त्या पेक्षा जास्त पदे रिक्त झाली तर संपुर्ण कार्यकारी मंडळ बरखास्त करुन एक महिन्याच्या आत विशेष सर्वसाधारण सभेत नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात येईल. या कालावधीमध्ये संस्थेच्या अध्यक्षांच्या मान्यतेने सचिवांना मर्यादित स्वरुपात काळजीवाहू कामकाज पाहण्याचे अधिकार प्राप्त होतील. या काळात धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार राहणार नाही.

9) जिल्हा संघटनेनी चौवार्षिक निवडणुकीसाठी नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी यांना उमेदवारी अर्जावर सुचक आणि अनुमोदन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

एक मतदार वेगवेगळ्या पदासाठी सुचक / अनुमोदन करु शकतो. (उदा :- अध्यक्ष, कार्याध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यासारख्या एकाकी पदासाठी करु शकतो.) मात्र वरील पदासाठी तो दुसऱ्या उमदेवाराचा सुचक /अनुमोदक होवु शकत नाही. उपाध्यक्ष व सहसचिव या पदासाठी तो पाच (05)

वेळा अनुमोदन/सूचक होऊ शकेल. (एक मतदार एकूण 15 वेळा सूचक / अनुमोदक होऊ शकेल)

जो मतदार या नियमाचे पालन करणार नाही आणि एकाच पदासाठी दोन वेळा सुचक / अनुमोदक झाला असेल तर उमेदवारावर दंडात्मक कारवाई न करता ज्याने दोन वेळा स्वाक्षरी केली आहे. अशाच मतदाराला संपूर्ण निवडणूक प्रक्रियेपासून वंचित ठेवले जाईल/ अपात्र ठरवले जाईल.

10) चौवार्षिक निवडणुकीमध्ये निवडुन आलेल्या नवनियुक्त 15 सदस्य असलेल्या कार्यकारी मंडळाचा फेरफार अर्ज मंजुरीसाठी सहायक धर्मदाय आयुक्त मुंबई यांच्या कार्यालयात दाखल केला जाईल. (प्रस्ताव दाखल करणेबाबतचे अधिकार (अर्जदार) कोणाला द्यावयाचे याबाबत कार्यकारी मंडळ निर्णय घेईल.)

11) "एक व्यक्ती, एक पद" आणि ‘एक व्यक्ती, एक मत’ या तत्वप्रणालीनुसार संस्थेच्या चौवार्षिक निवडणुकी मध्ये एका व्यक्तीला एकाच पदासाठी निवडणुक लढवता येईल. आणि एका व्यक्तीला एकाच मताचा अधिकार राहील.

अ) अर्ज भरण्याच्या निर्धारित दिनांकापर्यंत उमेदवाराला एक किंवा जास्तीत जास्त तीन पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. अर्ज दाखल करताना त्यावर 1, 2, 3 असे क्रंमाक टाकणे अनिवार्य राहील.

ब) अर्ज मागे घेण्याच्या निर्धारित तारखेपर्यंत सदरील उमेदवाराने आपले तीन पैकी कोणतेही दोन अर्ज मागे/ परत घेणे बंधनकारक राहील.

निर्धारित वेळेच्या आत अर्ज मागे / परत घेतला नाही तर निवडणुक निर्णय अधिकारी अर्ज क्रं. एक (1 ) चा अर्ज वैध /पात्र ठरवतील व अनुक्रमे दोन व तीन ( 2 व 3 ) क्रंमाकाचे अर्ज अवैध / अपात्र ठरवतील. या बाबत उमेदवाराला आक्षेप किंवा कसलीही तक्रार करता येणार नाही. निवडणुक अधिकार्यांने घेतलेला निर्णय कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

क ) "एक व्यक्ती, एक पद" आणि 'एक व्यक्ती, एक मत' हा नियम फक्त संस्थेच्या चौवार्षिक निवडणुकीसाठीच लागू राहील.

AKFI / MOA किंवा या संस्थेशी संबंधीत कोणत्याही संस्थेच्या निवडणुका लढविण्याचा /अर्ज करण्याचा किंवा मतदान करण्याचा अधिकार पदाधिकारी / सदस्यांना राहील.

ड) उमेदवाराची जाहीर झालेली यादी आणि मतदान दिनांक यामध्ये किमान पंधरा (15) दिवसाचे आंतर असणे अनिवार्य असेल. (चौवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम मतदान दिनांकाच्या किमान 45 दिवस अगोदर जाहीर करणे अनिवार्य राहील.)

इ ) अर्ज भरणे किंवा मागे घेणे यासाठी निर्धारित वेळेच्या आत उमेदवार निवडणुक कार्यालयात प्रत्यक्ष अर्ज आणुन देवु शकतो, शासकीय टपालाने पाठवू शकतो (मात्र निर्धारित वेळेच्या आत मिळणे अनिवार्य राहील.)

किंवा संस्थेच्या अधिकृत ई - मेल वर निर्धारित वेळेच्या आत अर्ज पाठवता येईल. हा पत्र व्यवहार अधिकृत ग्राह्य समजला जाईल.( अशा वेळी मुळ प्रत/ Hard Copy शासकीय टपालाने निवडणुक कार्यालयात उशीरा मिळाली / पोहचली तरी चालेल.)

12) राज्य संघटनेच्या चौवार्षिक निवडणुकीसाठी तीन प्रतिनिधी /मतदाराची नावे पाठविताना सोबत खालील दस्तावेज नमुद सूचनेप्रमाणे निर्धारित वेळेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे ई-मेल व्दारे, प्रत्यक्ष अथवा टपालाने सादर करणे अनिवार्य राहील. MSKA च्या अधिकृत ई- मेल वर हा दस्तावेज अपलोड करुन निर्धारित वेळेच्या आत पाठविला तर तो अधिकृत समजला जाईल. (ई-मेल व्दारे पाठविलेला दस्तावेज टपालाने उशिरा प्राप्त झाला तरी तो ग्राह्य धरला जाईल.)

अ) संस्थेच्या लेटरहेडवर रबरी शिक्यासह सचिवांच्या स्वाक्षरीने तीन प्रतिनिधीची नावे पाठवावीत.

ब) तीन प्रतिनिधीच्या नावाचा उल्लेख असलेला कार्यकारी मंडळाच्या ठरावाची (इतिवृत्त) सत्यप्रत सचिवाच्या स्वाक्षरीने पाठविणे अनिवार्य राहीले.

क) धर्मदाय कार्यालयात दाखल केलेले मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट ऑनलाईनची पोच पावती (साक्षांकित सत्यप्रत)

ड) परिशिष्ट - १ (शेड्युल - 1) धर्मदाय कार्यालयाने साक्षांकित केलेली प्रत

ई) मंजुर झालेला शेवटचा फेरफार अर्ज (परिशिष्ट-३) व आदेशाची प्रत धर्मदाय कार्यालयाने साक्षांकित केलेली .

फ) परिशिष्ट - १० ची धर्मदाय कार्यालयाने साक्षांकित केलेली प्रत.

जे संलग्न जिल्हे निर्धारित वेळेत उपरोक्त दस्तावेज पाठविणार नाहीत अशा जिल्ह्यानां निवडणुक प्रक्रियेत अपात्र ठरविले जाईल. (यामध्ये 'ड' आणि 'फ' मध्ये काही प्रमाणात सूट दिली जाईल. मात्र याबाबत निवडणूक कार्यक्रम पत्रिकेच्या जाहीर प्रगटनात स्पष्ट उल्लेख करणे अनिवार्य राहील.)

13) चौवार्षिक निवडणुकीचा कालावधी संपताच कार्यरत असलेले कार्यकारी मंडळाचे अस्तित्व संपुष्टात येईल काही तांत्रिक अडचणीमुळे नवीन कार्यकारी मंडळ कार्यान्वित होण्यास विलंब होत असेल तर हेच कार्यकारी मंडळ काळजीवाहू प्रशासक म्हणून कामकाज पाहतील. या काळात धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार या प्रशासक कार्यकारी मंडळाला राहणार नाही.

14) राज्य संघटनेवरील (MSKA) अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष या तीन पदाची निवडणुक लढवण्यासाठी खालील नियम व अटी पूर्ण करणारे उमेदवार पात्र ठरतील.

अ) सदर उमेदवार हा उत्कृष्ट गुणवत्तेचा खेळाडू असावा.

ब) किंवा सदर उमेदवाराने राज्य कार्यकारी मंडळातील इतर कोणतेही पदावर (एक टर्म म्हणजे ४ वर्ष) अगोदर काम केलेले पाहिजे.

क) किंवा जिल्हा संघटनेच्या कार्यकारी मंडळात अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष या तीन पदापैकी कोणत्याही एका पदावर किमान एक टर्म म्हणजे 4 वर्ष काम केलेले पाहिजे. (परंतु तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर नियम क्र.18 च्या तरतूदीने काही कारणास्तव संपूर्ण कार्यकारी मंडळ बरखास्त झाले तर अध्यक्ष/सचिव व कोषाध्यक्ष यांनी त्यांचा चार वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला असे समजण्यात येईल आणि त्यांना MSKA ची उपरोक्त तीन पदाची निवडणूक लढवण्याचा अधिकार प्राप्त होईल.

अन्य कोणत्याही व्यक्तीला MSKA चे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष या तीन पदाची थेट / सरळ निवडणुक लढविता येणार नाही. (राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील अनिवार्य तरतूद)

15) नियम क्र.12 मधील 4-अ आणि ब तसेच 6-अ आणि ब मधील पदांचे क्रम त्यांनी निवडणुकीत मिळवलेल्या मताधिक्याच्या आधारावर ठरवल्या जाईल. जर निवडणूक बिनविरोध झाली तर सभाध्यक्ष चिठ्ठ्यांद्वारे या पदाचा क्रम ठरवतील.

16) MSKA च्या चौवार्षिक निवडणुकीत कोणत्याही पदाच्या निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरताना शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाचे संमतीपत्र / नाहरकत पत्र (NOC) सोबत जोडणे अनिवार्य राहील. (राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील अनिवार्य तरतूद)

17) चौवार्षिक निवडणुकीसाठी जिल्हा संघटना अथवा उमेदवाराने कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे अथवा चुकीची माहिती दिली आणि ती पुराव्यासह सिध्द झाली तर अशा उमेदवाराचे चौवार्षिक निवडणुकीतील सदस्यत्व रद्द होईल.

## 14. कार्यकारी मंडळ व त्यांची कामे :

1) **अध्यक्ष :**

कार्यकारी मंडळ/सर्वसाधारण सभा / विशेष सर्वसाधारण सभेत अध्यक्षपद स्विकारुन कामकाज चालविणे, संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे, सभेचे अध्यक्ष म्हणून इतिवृत्तावर स्वाक्षरी करून, त्या इतिवृत्तास अधिकृत करणे. संस्थेच्या शाखांवर नियंत्रण ठेवणे, सभेची सूचना काढण्यास सचिवास निर्देश करणे, संस्थेच्या वतीने रक्कमेची देवाण-घेवाण करणे. वार्षिक / विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद स्विकारुन निर्णय देणे.

2) **कार्याध्यक्ष :**

अध्यक्षाच्या अनुपस्थितीत सभेचे अध्यक्षपद स्विकारणे तसेच त्यांची कामे करणे अन्यथा अध्यक्षांना संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे.

3) **वरिष्ठ उपाध्यक्ष :**

कार्याध्यक्षाच्या अनुपस्थितीत सभेचे अध्यक्षपद स्विकारणे तसेच त्यांची कामे करणे अन्यथा संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे.

4) **उपाध्यक्ष :**

वरिष्ठ उपाध्यक्षाच्या अनुपस्थितीत सभेचे अध्यक्षपद स्विकारणे तसेच त्यांची कामे करणे अन्यथा संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे. (नियम क्र.13-15 ची अट अनिवार्य)

5) **सचिव :**

संस्थेचा पत्रव्यवहार करणे, तक्रारीचे निवारण करणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे, संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यालयीन कामे करणे, रोजचे हिशोब रोज पाहून त्यावर सह्या करणे, खर्चाची देयके मंजूर करणे, वार्षिक हिशोबाची पत्रके तयार करुन ती सभेसमोर मांडणे, संस्थेच्या वतीने रक्कमेची देवाणं घेवाण करणे, संस्थेच्या स्थावर

मालमत्तेची देखरेख करणे, मंजुरी झालेले ठराव अध्यक्षाच्या परवानगीने आमलात आणणे, कर्मचारी नियुक्ती, बढती किंवा बडतर्फ करण्याचे अधिकार सचिवास राहतील. सचिवांना हाती रोख शिल्लक मर्यादा 25000/- रु. पर्यंत राहील. कायदेशीर बाबीची पुर्तता करणारे संस्थेच्या सर्व प्रकारच्या दस्तऐवजाची ( उदा:- प्राविण्य प्रमाणपत्र, अंतिम निकालपत्र, भाग्यपत्रक ईत्यादी.) काळजीपुर्वक जतन करुन ठेवण्याची जबाबदारी सचिवाची राहील.

याशिवाय शासन / न्यायालय / AKFI / MOA किंवा तत्सम कार्यालयाला त्यांनी मागणी केल्याप्रमाणे निर्धारित वेळेत माहिती पुरविणे सचिवाला बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय कामकाजामुळे खेळाडूचे नुकसान होणार नाही याची सचिवानी प्रथम प्राध्यान्याने काळजी घेणे अनिवार्य राहील. बैठकीच्या इतिवृत्तावर स्वतःची निळया शाईने स्वाक्षरी करणे, त्या इतिवृत्तावर सभाअध्यक्षाची स्वाक्षरी घेऊन ते अधिकृत करणे आणि सर्व संलग्न जिल्हा संघटनेच्या अधिकृत ईमेलवर इतिवृत्ताची छायांकित प्रत आठ दिवसाच्या आत पाठवणे सचिवाला अनिवार्य राहील.

6) **सहसचिव** :

सचिवाचे अनुपस्थितीत त्यांची कामे करणे अन्यथा सचिवांना संस्थेच्या कामात योग्य ती मदत करणे. तसेच स्पर्धेच्या आयोजन/नियोजनात राज्य संघटनेचे प्रतिनिधी म्हणून जबाबदारी पार पाडणे. (नियम क्र.13-15 ची अट अनिवार्य)

7) **कोषाध्यक्ष :**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे, हिशोब लिहिणे, अगर लिहून घेणे हिशोब लिहून पूर्ण झाल्यावर कार्यकारी मंडळासमोर मांडणे, हिशोबाचे पुस्तकातून काढलेल्या त्रुटीची पूर्तता करणे, रक्कमेची देवाण घेवाण करणे, लेखापरिक्षण करुन घेणे इत्यादी. संस्थेची आर्थिक परिस्थिती कशी सुधारेल यासाठी उपाययोजना आखणे. कोषाध्यक्षांना हाती रोख शिल्लक मर्यादा 10000/- रु. पर्यंत राहील. दर तीन महिन्याला अंतर्गत हिशोब तपासणी समितीमार्फत (Internal Audit) जमाखर्चास कार्यकारी

मंडळाची मंजुरी घेणे अनिवार्य राहील. 31 मार्चच्या आतर संस्थेचे वेगवेगळ्या मार्गांने प्राप्त होणारे शुल्क (फी/अनुदान/भाडे इ.) जमा करण्याची कार्यवाही करणे.

8) **कार्यकारी मंडळाचे सभासद :**

कार्यकारी मंडळाच्या सभेत व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहणे, निवडणुकीचे वेळी मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

9) **अजीव सभासद** :

सर्व साधारण सभेला स्वतःच्या इच्छेनुसार उपस्थित राहुन, संस्थेचे हीत, कब्बडी खेळाचा प्रसार व विकास किंवा खेळाडुंच्या गुणवत्तेबाबत मार्गदर्शन / मार्गदर्शक सुचना करु शकतील, परंतु या सुचना मान्य करण्याचे बंधन संस्थेला राहाणार नाही. या सदस्यांना संस्थेच्या कारभारात कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नाही. अथवा संस्थेच्या कोणत्याही निवडणुक प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही. किंवा मतदानाचा हक्क प्राप्त होणार नाही.

10) **अजिव आश्रयदाते** :

सर्व साधारण सभेला स्वतःच्या इच्छेनुसार उपस्थित राहुन, संस्थेचे हीत कब्बडी खेळाचा प्रसार व विकास किंवा खेळाडुंच्या गुणवत्तेबाबत मार्गदर्शन / मार्गदर्शक सुचना करु शकतील, परंतु या सुचना मान्य करण्याचे बंधन संस्थेला राहाणार नाही. या सदस्यांना संस्थेच्या कारभारात कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नाही. अथवा संस्थेच्या कोणत्याही निवडणुक प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही. किंवा मतदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. मात्र अशा सन्माननीय, प्रतिष्ठीत व्यक्तीबद्दल संस्थेला नेहमीच सन्मानपूर्वक आदर राहील.

11) **मुख्य आश्रयदाते** :

संस्थेचे हीत साधण्यासाठी आवश्यकता वाटल्यास कोणत्याही मान्यवर (50 वर्षे पूर्ण) व्यक्तीला मुख्य आश्रयदाते म्हणून चार (4) वर्षाकरिता कार्यकारी मंडळाच्या

संमतीने, सन्मानाने नियुक्त केल्या जाईल. अशा व्यक्तींना निवडणुकीत उभे राहण्याचा अथवा मतदानाचा किंवा संस्थेच्या इतर कुठल्याही कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार राहणार नाही. अशी व्यक्ती फक्त संस्थेला मार्गदर्शक सूचना करु शकतील. त्या सूचना मान्य करणे संस्थेला बंधनकारक राहणार नाहीत. नियुक्त केलेल्या तारखेपासून चार (4) वर्षानंतर अशा व्यक्तीचे मुख्य आश्रयदाते पद कुठलीही आगाऊ सूचना न देता आपोआप रद्द होईल. अशी व्यक्ती संस्थेची नेहमीच प्रेरणास्थान राहील. (संस्थेच्या हिताच्या दृष्टीने वयात कमी-अधिक बदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील)

## 15. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी चार (तीन महिन्याच्या फरकाने) व आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त कितीही सभा घेण्यात येतील. संस्थेच्या 2/3 सभासदांनी अध्यक्ष किंवा सचिव यांच्याकडे कार्यकारी मंडळाच्या सभेची मागणी केल्यास पंधरा दिवसाचे आत सभा / बैटक बोलवण्याचे बंधन राहील. अशी सभा बोलावतांना सूचनेत दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय आदी नमूद करणे आवश्यक राहील. वरील मुदतीत अध्यक्ष किंवा सचिव यांनी सभा न बोलावल्यास सभासदांपैकी कोणत्याही 10 सभासदांनी अशी सभा बोलावावी या सभेत मंजुर झालेले ठराव सर्वांना बंधनकारक राहातील. तातडीची सभा 24 तासाची ई-मेलद्वारे विषयपत्रिका पाठवून अध्यक्षाच्या परवानगीने सचिवाला घेण्याचा अधिकार राहील. मात्र यासाठी दूरध्वनीद्वारे / व्हाट्सअपद्वारे प्रत्येक सदस्याला संपर्क साधणे अनिवार्य राहील.

## 16. कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना किमान आठ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सूचनेमध्ये दिनांक, वेळ, ठिकाण व सभेचे विषय आदी नमुद करणे आवश्यक राहील. सूचना संस्थेच्या डाक बुकात/सूचना वहीत सही घेऊन अथवा टपालाद्वारे पाठविण्यात

येईल. किंवा कार्यकारी मंडळ पत्रव्यवहाराची जी पध्दत ठरवेल ती पध्दत (नोंदणीकृत फोनद्वारे व ईमेलद्वारे / एसएमएस द्वारे) सर्वांना बंधनकारक राहील मात्र या बदलाची मंजुरी सर्वसाधारण सभेत घेणे अनिवार्य राहील. कार्यकारी मंडळाचे 3/5 सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पूर्ण झाली असे समजण्यात येईल.

टीप :- सभेच्या ठरलेल्या वेळापासून 15 मिनीटापर्यंत गणसंख्या भरु शकली नाही, तर अशी सभा तहकूब केली जाईल व अशी तहकूब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी व त्याच विषयावर तहकूब सभेच्या वेळेपासून अर्ध्या तासांनी सुरु होईल. अशाप्रकारे तहकूब होऊन सुरु झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

## 17. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :

ज्या संलग्न जिल्हा संघटनेकडे संस्थेची कोणतीही रक्कम येणे बाकी आहे किंवा घटनेतील तरतूदीचे नियमोल्लंघन करणाऱ्या जिल्हा संघटनेच्या प्रतिनिधीला निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहता येणार नाही. अथवा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही. मतदानाचा हक्क स्वतःच बजवावा लागेल. कोणत्याही कारणास्तव स्वतःचे मतदान दुसऱ्या व्यक्तिला करता येणार नाही. ‘एक व्यक्ती एक मत’ हे तत्व अनिवार्य राहील.

## 18. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :

कार्यकारी मंडळातील कोणतेही पद किंवा पदे रिक्त झाल्यास ती पदे किंवा पद उर्वारित कार्यकारी मंडळाच्या बहुमताने भरण्यात येईल. (नियम क्रं. 12 मधील प्रवर्गाच्या नियम व अटी च्या अधीन राहुन )

कार्यकारी मंडळातील 3/4 (12 पदे) किंवा त्यापेक्षा अधिक पदे काही कारणाने रिक्त झाली तर पुर्ण कार्यकारी मंडळ बरखास्त केले जाईल. (त्याच वेळी उपसमितीमधील सर्व सदस्यांचे अस्तित्व आपोआप रद्द होईल.)

अ) विशेष सर्वसाधारण सभेचे एक महिन्याच्या आत आयोजन करुन नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात येईल.

ब) यासाठी चौवार्षिक निवडणुकीसाठी पात्र ठरलेले मतदार (79) मतदानाचा हक्क बजावतील. व उमेदवारी अर्जही दाखल करू शकतील.

क) अशा प्रकारे बरखास्त होवून निवडण्यात आले कार्यकारी मंडळ फक्त उर्वरित / शिल्लक राहिलेला कालावधीच पुर्ण करतील.

ड) मुदतपुर्व निवडण्यात आलेल्या या कार्यकारी मंडळाला उर्वरित/ शिल्लक राहिलेल्या कालावधीसाठी उपसमिती नियुक्त करता येईल.

## 19. कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवील. तसेच सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावांची पूर्तता करील. संस्थेचे काम सुरळीत चालावे म्हणून किरकोळ नियम तयार करील. एखाद्या कामाकरिता उपसमिती नियुक्त करु शकेल. हिशोब व माहिती वेळोवेळी घेण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास राहतील. संस्थेवर असलेल्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणे, कार्यकारी मंडळातील रिक्त स्थान भरणे, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, बदली, सेवासमाप्ती, निलंबन आदी कार्ये करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास राहतील. उपसमितीची रचना, कार्य व ती रद्द करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळास राहतील. बहुमताने मंजूर झालेला ठराव कायदेशीर ठरुन सचिवांमार्फत आमलात आणला जाईल. जिल्हा असोसिएशनला संलग्नता देण्याबाबत सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणे. AKFI / MOA या संस्थेवर पाठविण्यात येणाऱ्या प्रतिनिधीची घटनेतील तरतूदी प्रमाणे कार्यकारिणी मंडळातील पदाधिकाऱ्यामधून निवड करणे. वेळेवर येणाऱ्या ठरावांवर निर्णय देणे. कब्बडीच्या विकासात्मक ध्येय धोरणातील एकाच उपक्रमावर होणारा खर्च पाच लक्ष रुपये पेक्षा जास्त असेल तर या खर्चास सर्वसाधारण सभेची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील. परिस्थितीनुसार उद्भवणाऱ्या प्रश्नावर / अडचणीवर निर्णय घेणे. संस्थेच्या ध्येय/ उद्दिष्टाला नुकसान पोहोचविणाऱ्या खेळाडू, प्रशिक्षक, पंच,

आदि तत्सम घटक यांनी जर जाणीवपूर्वक नुकसान केले असेल अशा दोषीवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाला राहतील.

कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष सभेचे अध्यक्षस्थान भूषवतील त्यांच्या गैरहजरीत कार्याध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, उपाध्यक्ष (गुणानुक्रमे) काम पाहतील. (नियम क्र.13 मधील 15 ची अट अनिवार्य राहील) यापैकी कोणीच हजर नसेल तर उपस्थित सदस्यांपैकी बहुमताने एकाची सभाध्यक्ष म्हणून निवड केली जाईल व त्यानंतर सभेचे कामकाज सुरु होईल. बहुमताच्या प्रक्रियेत समान मत पडल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार सभाध्यक्षास राहील.

## 20. कार्यकारी मंडळातील पदाधिकार्यांचे वय व पदाची कमाल मर्यादा

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील तरतूदीप्रमाणे कार्यकारी मंडळातील पदाधिकाऱ्यांचे वय व पदाची काल मर्यादा किती असावी याबाबत मार्गदर्शक सुचना राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मध्ये केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने राज्य व जिल्हा असोसिएशन ने खालील नियमाचे काटेकोर पालन करावे.

1) कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत भाग घेणाऱ्या उमेदवाराचे व मतदारांचे वय 25 वर्ष पूर्ण व 70 वर्षापेक्षा कमी असावे. परंतु निवडणूकीत अर्ज भरताना उमेदवाराचे वय 70 वर्षापेक्षा कमी असेल आणि तो निवडुन आला असेल तर तो आपल्या पदाचा कार्यकाळ पूर्ण करू शकेल. उमेदावारी अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक व प्रत्यक्ष मतदानाची तारीख यामध्ये 15 दिवसांचे अंतर असणे अनिवार्य राहील.

2) राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील तरतुदीप्रमाणे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष या तीन पदाला (04) चार वर्षाचे सलग किंवा वेगवेगळे पद ( 03 ) तीन टर्म धारण करता येईल. म्हणजे एकूण (12) बारा वर्षे त्यांना उपरोक्त तीन पदावर काम करता येईल.त्यानंतर ( 01) एक टर्म म्हणजे (04) चार वर्षाचा विश्रांतीचा कालावधी घेणे अनिवार्य राहील.विश्रांतीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुन्हा या तीन पदासाठी किंवा कार्यकारी मंडळातील इतर कोणत्याही / अन्य पदाची निवडणूक लढण्यास पात्र ठरतील. असे ( 70 ) सत्तर वर्षापर्यंत उमेदवार उपरोक्त पदे धारण करू शकतील. ( विश्रांतीच्या

कालावधीमध्ये सदरील उमेदवारास महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या आस्थापनेवरील कोणतेही पद धारण करता येणार नाही.)

3) कार्यकारी मंडळातील अध्यक्ष,सचिव व कोषाध्यक्ष या तीन पदालाच फक्त विश्रांतीचा कालावधी लागू राहील. अन्य पदावर ( 70 ) सत्तर वर्षापर्यंत सलग काम करता येईल.

## 21. खेळाडू आयोग (Athlete Commission)

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 च्या तरतुदीमध्ये "खेळाडू आयोग" स्थापना करणे अनिवार्य केले आहे. प्रशासनाच्या निर्णय प्रक्रियेत खेळाडूचा प्रत्यक्ष सहभाग असावा हा त्यामागील उद्देश आहे. अ आणि ब अशा दोन विभागात खेळाडू आयोगाची रचना राहील. एक व्यक्ती, एक पद हे तत्व खेळाडू आयोगाला सुध्दा लागू राहील.

अ) अतिउच्च गुणवत्तेचे माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू /Sportsperson or outstanding merit (SOM)

ब) ॲथलीट कमिशन ( Athlete Commission )

या आयोगातील एकूण (04) चार खेळाडू सर्वसाधारण सभेचे सभासद / मतदार होतील. आणि या चार खेळाडूंचा कार्यकारणी मंडळात समावेश करणे बंधनकारक / अनिवार्य राहील. "खेळाडू आयोगात" 50% टक्के महिला खेळाडूंना प्राधान्य देण्यात येईल. म्हणजे चार पैकी दोन महिला खेळाडू असणे अनिवार्य राहील.

खालील नियम व अटीच्या अधिनस्त राहून "खेळाडू आयोगाची" स्थापना / रचना करण्यात येईल.

**अ) अतिउच्च /प्रख्यात/ उत्कृष्ट माजी आंतरराष्ट्रीय दोन खेळाडूची ( एक पुरूष व एक महिला ) निवड करण्यासाठी खालील प्रमाणे निकष राहतील.**

1. अर्जदार भारतीय / महाराष्ट्र राज्याचा नागरिक असावा व किमान एक वर्ष अगोदर तो खेळातून निवृत्त झालेला असावा.

2. अर्जदाराने कबड्डी खेळामध्ये महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे प्रतिनिधित्व केलेले असावे.

3. अर्जदाराने भारताचे प्रतिनिधित्व करत मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभाग घेतलेला असावा

4. अर्जदार हा कबड्डी खेळातील मेजर ध्यानचंद खेलरत्न, अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू असावा.

5. अर्जदारावर कोणत्याही सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निलंबन किंवा अपात्रतेची कारवाई केलेली नसावी.

6. अर्जदारास राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम, २०२५, राष्ट्रीय क्रीडा सुशासन नियम 2026 व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे संविधान, नियम व आचारसंहितेचे पालन करणे अनिवार्य राहील. त्यास त्यांची सहमती असावी.

7. राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील पात्रता व अपात्रतेचे सर्व नियम/ निकष अर्जदार खेळाडूला बंधनकारक/ लागू राहतील.

8. अर्जासोबत दाखल केलेले सर्व कागदपत्रे स्वतः साक्षांकित केलेले असावेत.

9. अर्जदार माजी खेळाडूचे वय 25 वर्षापेक्षा जास्त व 70 वर्षापेक्षा कमी असावे.

10. प्राप्त अर्जाची समितीमार्फत छाणनी करून गुणवत्तेच्या निकषावर दोन खेळाडूंची (एक पुरुष व एक महिला) निवड केली जाईल.

11. निवड झालेले खेळाडू वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकृत सदस्य/मतदार होतील व त्यांना या सभेचे सर्व अधिकार प्राप्त होतील.

12. अर्जदार खेळाडूस विहित नमुन्यातील स्वयघोषणापत्र/प्रतिज्ञापत्र देणे अनिवार्य राहील.

**ब) अथलीट कमिशन ( Athlete Commission )**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनला सलग्न असणाऱ्या जिल्हा संघटनेने आपल्या स्तरावर किमान अति उच्च कामगिरी करणाऱ्या बहुसंख्य पात्र खेळाडूंची जाहीर प्रगटनाद्वारे नोंदणी करावी. सर्व खेळाडूंची एकत्र सभासद यादी तयार करावी. आणि लोकशाही पद्धतीने पुरुष व महिलांसाठी स्वतंत्रपणे मतदान घेण्यात यावे. घेण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेमधुन एक पुरुष व एक महिला खेळाडूंची मिळालेल्या मताच्या

आधारावर निवड घोषित/ जाहीर करावी. आणि जिल्ह्याचे खेळाडू समितीचे प्रतिनिधी म्हणून या दोन खेळाडूंचे राज्य संघटनेकडे नामनिर्देशन करावे.

राज्य संघटनेकडे एकत्रित झालेल्या 25 पुरुष खेळाडू व 25 महिला खेळाडू मध्ये उपरोक्त लोकशाही पद्धतीने पुन्हा निवडणूक घेऊन एक पुरुष व एक महिला खेळाडूंची निवड करावी. निवडलेले हे दोन खेळाडू राज्य संघटनेच्या सर्वसाधारण सभेचे सभासद होण्यास पात्र होतील.

" अ " आणि " ब " गटातील पात्र खेळाडूना राज्य संघटनेच्या सर्व साधारण सभेचे सभासद / मतदार म्हणून मान्यता मिळेल. आणि ते चौवार्षिक निवडणुकीत सहभाग घेण्यास अधिकृत / स्वीकृत होतील.पात्र ठरलेले हे खेळाडू आपला चार वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करतील. खेळाडू आयोगातील प्रत्येक खेळाडूला 200 रु. प्रवेश नोंदणी फी /शुल्क भरणा करणे अनिवार्य राहील. फी मध्ये अदलाबदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. या निर्णयास वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे अनिवार्य राहील. चार वर्षाचा कालावधीत संपताच खेळाडू आयोगातील चारही खेळाडूंचे अधिकार अस्तित्व कुठलीही सूचना न देता अपोआप संपुष्टात येईल/ रद्द होईल. शासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचारी खेळाडूने आपल्या कार्यालयाचे संमतीपत्र/नाहरकत पत्र (NOC) देणे अनिवार्य राहील.

## 22. संलग्न जिल्हा असोसियशन करिता मार्गदर्शक तत्वे.

1) दरवर्षी जिल्हा अंजिक्यपद व निवड चाचणी (किशोर /किशोरी, कुमार / कुमारी व वरिष्ठ गट पुरुष / महिला या गटाच्या सर्व स्पर्धा किंवा भविष्य काळात निर्माण होणारे कोणतेही गट) स्पर्धेचे आयोजन करणे जिल्हा संघटनेला अनिवार्य राहील. याकरिता मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक स्वरुपाची जाहिरात करणे जिल्हा संघटनेला अनिवार्य राहील.

अ) स्पर्धा संपल्यावर आठ दिवसाच्या आत निरीक्षकाच्या स्वाक्षरीने स्पर्धेचा अहवाल, भाग्यपत्रक, अंतिम निकाल, गुणपत्रक, पेपरचे कात्रण, स्पर्धेचे

ठळक क्षणचित्रे (फोटो) , स्पर्धेची माहिती देणारे परिपत्रक ई. दस्तावेज MSKA च्या अधिकृत मेलवर अपलोड करुन मुळ प्रत (Hard copy) टपालाने राज्य कचेरीत पाठवणे अनिवार्य राहील.

ब) या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या जिल्हा संघटनेवर दंडात्मक कार्यवाही म्हणुन रुपये 10000/- (दहा हजार रुपये) दंड राज्य संघटनेकडे 31 मार्च च्या आत भरणा करावी लागेल. (दंडाची रक्कम कमी अधिक करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील)

दंडाची रक्कम जोपर्यंत भरणार नाहीत तोपर्यंत अशा संघटनेला चौवार्षिक निवडणुकीत भाग घेता येणार नाही. किंवा त्यांना मतदानाचा हक्क राहणार नाही.

2) जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी कब्बड्डी स्पर्धेसाठी राज्य संघटनेतर्फे एक निरिक्षक पाठविला जाईल. यासाठी जिल्हा अजिक्यपंद स्पर्धेची तारिख व परिपत्रक किमान पंधरा दिवस अगोदर राज्य संघटनेकडे पाठविणे अनिवार्य राहील. सदरील निरीक्षकाचे प्रवास भाडे निवास व भोजनभत्ता यावर होणारा खर्च जिल्हा संघटनेने करणे अनिवार्य राहील.

3) सग्लन जिल्हा संघटनेचा चौवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला की, राज्य संघटनेतर्फे एका निरिक्षिकाची नियुक्ती केली जाईल.

4) जिल्हा संघटनेची घटना ही राज्य संघटनेच्या घटनेतील मार्गदर्शक तत्वावर अधारित असणे अनिवार्य आहे. (सर्व संलग्न जिल्ह्याच्या घटनेचे प्रारुप एकच असेल)

5) जिल्हा संघटनेमध्ये कोणत्याही प्रकारचे बद्दल केले तर, (नियम क्र.5 मधील पोटनियम क्र.1 ते 9 वगळून) त्याबदलाची नोंद त्वरित धर्मदाय आयुक्त कार्यालयात नोंदीसाठी दाखल करणे अनिवार्य राहील. व त्याची पोच किंवा शक्य

झाल्यास मंजुर बदल अर्जाची सत्यप्रत राज्य संघटनेकडे त्वरित दाखल करणे अनिवार्य राहील.

6) जिल्हा संघटनेच्या वार्षिक सर्व साधारण सभेने मंजुर केलेले लेखा विवरण पत्र दरवर्षी निर्धारित वेळेत धर्मदाय कार्यालयात ऑनलाईन दाखल करावेत. या पोच पावतीची सत्यप्रत व सभेचे ईतिवृत राज्य संघटनेच्या अधिकृत ई-मेलवर एक महिन्याच्या आत दरवर्षी सातत्याने अपलोड / दाखल करणे अनिवार्य राहील. (टपालाने मुळ प्रत / Hard Copy पाठवावी.)

7) ॲमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया (AKFI) मार्गदर्शक तत्वे व महाराष्ट्र राज्य कब्बड्डी असोसियशनच्या (MSKA) नियमानुसार व नियत्रणाखाली सग्लन जिल्हा संघटनेचे कामकाज चालेल.

8) राज्य कार्यकारणी व सर्व साधारण सभेने घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करणे जिल्हा संघटनेला बंधनकारक राहील.

9) राज्य / राष्ट्रीयस्तरावरील किंवा अन्य कोणत्याही मान्यता प्राप्त निमत्रित स्पर्धेमध्ये सहभागी होण्यापुर्वी स्थानिक किंवा व्यवसायिक संघानी संलग्नित जिल्हा / राज्य संघटनेची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

10) कोणत्याही कारणास्तव खेळाडु, सामनाधिकारी किंवा अन्य प्रकारे कोणामध्ये वाद निर्माण झाल्यास त्याचा न्याय निवाडा राज्य संघटना करेल. तो सर्वांना बंधनकारक राहील.

11) जिल्हा असोसिएशनला आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक/रहिवाशी असलेल्या कबड्डी खेळाडूंचा खेळातील दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे अनिवार्य राहील. याच खेळाडूंना गुणवत्तेच्या निकषावर जिल्हा संघात खेळण्याचा हक्क राहील.

12) राज्य संघटनेच्या धोरणानुसार आपल्या जिल्ह्यातील संलग्न सर्व खेळाडुंची/ पंचाची निर्धारित वेळेत व निश्चित केलेल्या शुल्कासह राज्य संघटनेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे नोंदणी करणे सर्वांना अनिवार्य /बंधनकारक राहील.

13) राज्य संघटनेच्या विविध उपक्रमाच्या आयोजनाची मागणी करुन, संस्थेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ते यशस्वी करणे ( उदा :- राज्य / राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा, पंच उजळणी वर्ग, स्पर्धा पुर्व सराव शिबीरे ईत्यादीचे आयोजन करणे )

14) महाराष्ट्रातील खेळाडुंना राज्यातील कोणत्याही क्लब / क्रीडा मंडळे / कब्बड्डीचे प्रशिक्षण देणाऱ्या तत्सम संस्था यांच्याकडून कबड्डीचे प्रशिक्षण/ मार्गदर्शन घेण्याचा अधिकार राहील.

मात्र त्यांना आपल्या रहिवाशी मुळ जिल्ह्याकडुनच जिल्हा निवड चाचणीत सहभागी / खेळावे लागेल. (जिल्हा बदलीचा नियम लागू राहील) खेळाडूचा मुळ जिल्हा म्हणजे स्वतः किंवा आई-वडिलाचे किमान दहा वर्षे ज्या जिल्ह्यात आदिवास / रहिवास / वास्तव्य आहे व त्यांच्याजवळ मा.तहसिलदार यांनी दिलेले रहिवाशी प्रमाणपत्र (Domacile Certificate) असणे अनिवार्य राहील.

15) वार्षिक सभेत जिल्हा संघटनेचा वार्षिक अहवाल लिखीत व PPT द्वारे सादर करणे जिल्हा सचिवाला अनिवार्य राहील.

16) राज्य संघटनेच्या अधिपत्याखाली होणाऱ्या दरवर्षीच्या गटनिहाय राज्य अजिंक्यपद स्पर्धांचे आयोजन किमान सोयी व सुविधांच्या तत्वावर (भोजन, निवास व दर्जेदार मैदान अनिवार्य) संलग्नित जिल्हा संघटनेला चक्राकार/रोस्टर पध्दतीने करणे अनिवार्य राहील.

17) जिल्हा संघटनेला संलग्न असलेल्य ज्या स्थानिक संस्था BPT Act 1860 व 1950 अंतर्गत स्थापन झालेल्या आहेत त्यांनाच शासनाचे अनुदान, खेळाडूकडून फी जमा करण्याचे किंवा अन्य आर्थिक व्यवहार करण्याचे अधिकार प्राप्त होतील. (राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 मधील तरतूदीप्रमाणे माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत MSKA व तिचे संलग्न जिल्हे 'सार्वजनिक प्राधिकरण' मानले जातील.)

## 22. AKFI / MOA या संघटनेवर प्रतिनिधी पाठविण्याची पध्दत :

भारतीय हौशी कबड्डी महासंघ ( AKFI ), महाराष्ट्र ऑॅलंम्पीक असोसियशन ( MOA ) किंवा तत्सम वरिष्ठ संस्थेच्या निवडणुकीसाठी किंवा ईतर कामकाजासाठी राज्य संघटनेचे प्रतिनिधी पाठवावे लागतात.

AKFI / MOA किंवा तत्सम संबधित संस्थेने वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे ही कार्यवाही राज्य संघटनेला करावी लागते. असे नामनिर्देशन करताना अनुक्रमे संस्थेचे अध्यक्ष व त्यानंतर सचिवाचे नावे पाठविणे अनिवार्य राहील.

मात्र यांनी जाण्यास नकार दिला तर उर्वरित नावाची निवड कार्यकारी मंडळात बहुमताने केली जाईल. (नियम क्र.13-1 ची अट अनिवार्य) त्यानंतर सबंधित संस्थेला नावे कळविण्यात येतील. (हा विषय सभेच्या विषयपत्रिकेत नमुद करणे व सभेच्या ईतिवृतात लिहणे अनिवार्य राहील.) उपरोक्त संस्थेवर पाठवलेली नावे (व्यक्ती) संबंधित संघटनेच्या नियमाप्रमाणे आपला कार्यकाळ पुर्ण करतील.

## 23. संस्थेच्या निधी मिळकत व विनियोग :

सभासद फी, देणगी, शासकीय व निमशासकीय अनुदान, स्पर्धा मान्यता शुल्क, खेळाडू नोंदणी शुल्क ही संस्थेच्या उत्पन्नाची साधने राहतील. संस्थेच्या उद्देशपूर्ती करिता चारिटी शो, स्पर्धा, मेळावे घेऊन निधी गोळा करता येईल व तो स्थावर स्वरुपाच्या उद्देशावर गुंतविता येईल. अशा मिळकतीची नोंद पी.टी. रजिस्टरला बदल अर्ज देऊन करण्यात येईल. संस्थेच्या उद्देशानुसार प्राप्त झालेल्या रक्कमेपैकी 5% रक्कम ही संस्थेच्या फंडात जमा केली जाईल.

## 24. निधी

राज्य कबड्डी असोसिएशनने जमा केलेला निधी कार्यकारी समितीने मंजूर केलेल्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा केला जाईल. हे खाते महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई या नावाने राहील.

**खेळाडू कल्याण निधी**

ताळेबंधातील शिल्लक निधीच्या किमान 5 टक्के रक्कम खेळाडूच्या भवितव्यासाठी (खेळ ईजा किंवा सोयी-सुविधेसाठी) राखीव ठेवण्यात यावा. निधी गोळा करण्याबद्दल कार्यकारी मंडळ ठराव घेऊन त्या बाबत निश्चित धोरण ठरवील.

**पायाभूत सुविधा निधी**

ताळेबंधातील शिल्लक निधीच्या किमान 5 टक्के निधी कबड्डी खेळाच्या विविध ठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजित करावा.

## 25. स्थावर मालमत्ता खरेदी विक्रीची तरतूद :

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणे व विक्री करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला बहुमताने राहील. मात्र त्यांना सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे बंधनकारक आहे. संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास त्या अगोदर मा.धर्मदाय सह आयुक्त, मुंबई यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

## 26. कर्ज किंवा ठेवी संबंधीची तरतूद :

संस्थेला आवश्यकता वाटल्यास कोणत्याही संस्थेकडून / व्यक्तीकडून कर्ज किंवा ठेवी स्विकारता येतील. त्याकरीता मा. धर्मदाय सह आयुक्त मुंबई विभाग, मुंबई यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

## 27. बँक खाते :

संस्थेजवळ शिल्लक असलेली कोणतीही रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन मुंबई या नावाने ठेवता येईल. या खात्यावरचा व्यवहार संस्थेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यापैकी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने पूर्ण करण्यात येईल. (कोषाध्यक्ष अनिवार्य राहतील) याबाबत कार्यकारी मंडळ बहुमताच्या आधारे निर्णय घेऊन बँकेला कळवेल. (कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेली दोन नावेच बँकेला कळवण्याची जबाबदारी सचिवाची राहील.)

## 28. उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :

ज्या उद्देशाने जी रक्कम गोळा केली असेल ती रक्कम त्या उद्देशांवर 95% खर्च करण्यात येईल व उर्वरीत 5% रक्कम संस्थेच्या स्थावर मालमत्तेत/फंडात / गंगाजळीत जमा करण्यात येईल. यासाठी संस्थेच्या नावे स्वतंत्र खाते काढावे. या गंगाजळीतील रक्कम आणिबाणीच्या परिस्थितीत खर्च करायची गरज पडल्यास विशेष सर्वसाधारण सभेची बहुमताने मान्यता घेणे अनिवार्य राहील. (या सभेसाठी किमान 3/4 सभासद उपस्थित असल्याशिवाय हा निर्णय घेता येणार नाही)

## 29. सभासदाची यादी ठेवण्याची पध्दत :

अ) 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमात कलम 15 अ नुसार संस्थेचे जे सभासद असतील त्याची एक यादी 1950 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम 15 प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल.

ब) 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 प्रमाणे व 1950 संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 7 प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एकाच्या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठवावी लागेल.

क) 1860 चे नोंदणी अधिनियमातील कलम 4 अ प्रमाणे 1950 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 8 प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीला लावलेल्या व्यक्तींना नोकरी संबंधी अटींची विवरण अनुसूची दोन या नमुन्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठवावे लागेल.

## 30. नियम व नियमावलीत बदल करावयाची तरतूद :

संस्थेच्या नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास (राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनयम 2025 च्या नियमाचे उल्लंघन न करता) सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांचे 3/4 बहुमताने ठराव मंजूर करुन घेण्यात येईल. 1860 चे संस्था नोंदणी

अधिनियमाचे कलम 12 प्रमाणे ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. ही सभा कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन घेता येणार नाही.

## 31. संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करावयाची तरतूद :

संस्थेच्या नावात किंवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास ते सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदाच्या 3/4 बहुमताने ठराव मंजूर करुन घेण्यात येईल. 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम 12 प्रमाणे ही कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. नियम क्र.30 ची अट अनिवार्य.

## 32. पत्रव्यवहाराची पध्दत :

सर्व प्रकारच्या सभासदांनी / जिल्हा संघटनेने आपला पत्रव्यवहाराचा पत्ता कार्यकारिणीच्या बहुमताने दिलेला आहे तोच पत्ता ग्राह्य धरला जाईल. त्याच पत्त्यावर पत्रव्यवहार केला जाईल आणि तो पत्रव्यवहारच अधिकृत समजला जाईल.

एखाद्या सभासदाचा / जिल्हा संघटनेचा काही कारणास्तव पत्ता बदलला असेल किंवा सभासदाच्या सोयीनुसार पत्यात बदल करावयाचा असेल, अशा सभासदांनी / जिल्हा संघटनेने लेखी स्वरुपात संस्थेला कळवून राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत पत्ता बदलाची नोंद मंजूर करुन घ्यावी. त्यानंतरच बदललेला पत्ता ग्राह्य धरला जाईल. जिल्हा / राज्य संघटनेच्या अधिकृत ई-मेलवर निर्धारित वेळेच्या आत केलेला कोणताही पत्रव्यवहार अधिकृत व ग्राह्य समजला / धरला जाईल.

## 33. आयोग व उपसमिती स्थापना :

संस्थेच्या हितासाठी कार्यकारी मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभा राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम 2025 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे संस्थेचे कार्य सुरळीत व प्रभावी व्हावे यासाठी वेगवेगळ्या आयोगाची व उपसमित्यांची स्थापना करेल या आयोगात व उपसमितीमध्ये संस्थेचे ध्येय उद्दिष्टे पूर्ण करण्यास असणाऱ्या सक्षम व योग्य तज्ञ व्यक्तींचा समावेश करेल. या आयोगाचा / उपसमितीचा कालावधी कार्यकारी मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभा बहुमताने निर्णय घेऊन ठरवेल. राज्य संघटनेचे सचिव हे सर्व आयोग व उपसमितीचे पदसिद्ध सदस्य राहतील. कोणत्याही कारणाने कार्यकारी मंडळ

बरखास्त झाल्यास आयोग उपसमितीमधील सर्व सदस्यांचे अधिकार / अस्तित्व आपोआप रद्द होईल / संपुष्टात येईल.

1) लवाद आयोग

2) खेळाडू आयोग

3) आचारसंहिता आयोग

4) महिला आयोग

5) युवा आयोग

6) एन. एस. जी. ए. ( NSGA ) 2025 च्या आवश्यकतेनुसार आणि वैद्यतेनुसार इतर कोणतेही आयोग

**उपसमित्या**

1) तांत्रिक समिती

2) पंचमंडळ

3) शिस्तपालन समिती

4) नियम समिती

5) कार्यक्रम समिती

6) सर्कल स्टाईल समिती

7) बीच कबड्डी समिती

8) बीच कबड्डी तांत्रिक समिती

9) सचोटी समिती

10) अंतर्गत तक्रार समिती

11 ) तपासणी आणि विकास समिती

12) वित्त समिती

13) विवाद समिती

14) लैंगिक छळ प्रतिबंध समिती

15) उत्तेजक द्रव्य विरोधी समिती

16) प्रसिद्धी समिती

17) राष्टीय संबंध समिती

18) मेक इन इंडिया समिती

19) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा समन्वय समिती

20) तक्रार निवारण समिती

ई. उपसमित्यांचा समावेश असेल.

## 34. खेळाडू जिल्हा बदली नियम

खेळाडू ज्या जिल्ह्याचा रहिवाशी आहे त्याच जिल्ह्याकडून खेळणे त्याला बंधनकारक राहील. खालील कारणास्तव त्याला विनाअट जिल्हा बदली करता येईल.

1) शासकीय व निमशासकीय कार्यालयातील बदलीपात्र कर्मचारी व त्यांची मुले

2) CET परीक्षेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेशपात्र विद्यार्थी खेळाडू

3) विवाहित महिला

हे विनाअट जिल्हा बदलीस पात्र राहतील. (सक्षम पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)

4) 10 वर्षापेक्षा जास्त दिवस एखाद्या जिल्ह्यात पालक/खेळाडू यांनी स्थलांतर केले असल्यास अशा खेळाडूंना विनाअट जिल्हा बदली करता येईल मात्र त्यांना मा.तहसिलदाराने दिलेला रहिवाशी प्रमाणपत्राचा पुरावा सादर करावा लागेल.

अन्य कारणास्तव जिल्हा बदली करणाऱ्या खेळाडूंना किमान दोन वर्षाचा विश्रांतीचा कालावधी घेणे अनिवार्य राहील. याबाबतचे सविस्तर नियम व अटी तयार करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

## 35. शिस्तपालन

MSKA ने खेळाविषयी निश्चित केले नियम व अटींचे पालन करणे खेळाडु, पंच , पदाधिकारी व स्पर्धा आयोजक संस्था यांना बंधनकारक राहातील.

उपरोक्त पैकी कोणीही नियमबाह्य वर्तन करुन संस्थेच्या ध्येय , उद्दिष्टांना बाधा आणण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न करतील अशा व्यक्तीवर / समूहावर दंडात्मक कारवाई केली जाईल. दंडात्मक शिक्षेची तरतूद किती असावी याबाबत चे सर्व अधिकार कार्यकारी मंडळाला राहातील.

## 36. डोपींग

MSKA अंतर्गत होणाऱ्या सर्व प्रकारच्या स्पर्धेत खेळाडुंनी नियमाने / नैसर्गिक गुणधारणेचा अवलंब करुन आपला खेळ प्रदर्शित केला पाहिजे . पंरतु खेळाडु जर मादक द्रव्याचे किंवा नशीले पदार्थाचे सेवन करुन खेळत असतील तर त्यांची ही कृती नियमबाह्य / अनैसर्गिक ठरवली जाईल.

अशा खेळाडु / संघावर WADA / NADA च्या दंडात्मक शिक्षेच्या तरतुदीनुसार कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने कठोर कारवाई केली जाईल.

संशयीत खेळाडुंचे रक्ताचे व लघवी चे नमुने तपासणी साठी घेतले जातील.

अशा प्रकारचे सॅम्पल देणे खेळाडुंना बंधनकारक राहील. त्याशिवाय अंतिम निकाल घोषित केला जाणार नाही.

## 37. खेळाडु विमा

MSKA अंतर्गत निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडुंना स्पर्धे दरम्यान खेळताना दुखापत ( खेळ ईजा ) झाल्यास त्यांना नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत मिळावी या हेतुने खेळाडुंचा विमा काढण्यात यावा.( विमा कंपनीच्या नियम व अटीच्या आधीन राहुन) याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

## 38. राज्याचे प्रातिनिधीक संघ निवड, प्रशिक्षण व स्पर्धा प्रक्रिया पध्दत

भारतीय हौशी कब्बडी महासंघाच्या सुचनेनुसार राज्य संघाची निवड प्रक्रिया कार्यकारी मंडळाच्या बहुमताने सचिवामार्फत खालील प्रमाणे राबविली जाईल.

1) सर्व गटाच्या स्पर्धाचे परिपत्रक किमान एक महिना अगोदर जिल्हा संघटनेला प्राप्त होणे अनिवार्य राहील. ( आपत्तकालीन परिस्थितीत सचिवाला यामध्ये बदल करता येईल.)

2) सलग्न जिल्ह्या संघातुन गुणवत्तेचा निकष लावुन स्पर्धापुर्व सराव शिबीरासाठी वीस (20) खेळाडुंची प्राथमिक निवड केल्या जाईल. (निवड समितीच्या तांत्रिक अडचणीमुळे गुणवत्तेचे निकष पुर्ण करणारा एकादा खेळाडु वंचित राहात असेल तर अशा खेळाडु बाबत संबंधित जिल्ह्याचा लेखी खुलासा व उद्‌भवलेल्या

परिस्थितीचा सारासार विचार करून अशा खेळाडूंना न्याय देण्याचा अधिकार सचिवाला राहील. (हा अधिकार फक्त सराव शिबिरापर्यंत मर्यादीत राहील.)

3) राज्य अजिक्यंपद स्पर्धा कालावधीमध्ये महाराष्ट्रातील अतिउच्च दर्जाचे खेळाडु जर AKFI च्या अधिकृत राष्ट्रीय सराव शिबीरात असतील आणि त्यांना जर राज्य अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होता येत नसेल तर अशा खेळाडुची नावे सरळ सराव शिबीराच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याचा अधिकार सचिवाला राहील. (समाविष्ट केलेली नावे 20 खेळाडूच्या व्यतिरीक्त असतील.)

4) निवड समिती एकुण चार जणाची खालील प्रमाणे राहील

   अ) कार्यकारी मंडळातील एक पदाधिकारी

   ब) एक माजी राष्ट्रीय खेळाडु किमान दोन वेळा महाराष्ट्राचे राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेला निवृत्त खेळाडू ज्याचे वय वरिष्ठ गटासाठी किमान 45 व कुमार/किशोर गटासाठी किमान 35 वर्षापेक्षा जास्त असावे.

   क) जिल्हा संघटनेला संसग्न असलेल्या स्थानिक संस्थेच्या माध्यमातून दररोज कबड्डीचा सराव घेणारा शिक्षक.

   ड) कार्यकारी मंडळाने संघासाठी नियुक्त केलेले प्रशिक्षक

   ई) कोणत्याही निवड समितीचे पदसिध्द सदस्य राज्य सचिव राहातील.निवड प्रक्रियेच्या बहुमतात समानता आढळून येत असेल तरच निर्णायक मत देण्याचा अधिकार सचिवाला राहील. (अन्यथा निवड समितीच्या कामकाजात हस्तक्षेप करता येणार नाही)

5) संघाचे प्रशिक्षक निवडतांना एक मुख्य प्रशिक्षक व एक सहाय्यक प्रशिक्षक नेमावा यामध्ये

   अ) मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी MSKA चे दोन वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणारा निवृत्त खेळाडू किंवा दोन वर्षाची पतियाळा येथील NIS ची पदवी प्राप्त करणारा प्रशिक्षक.

   ब) सहायक प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी जिल्हा संघटनेला संलग्न असलेल्या स्थानिक संस्थेत दररोज सराव घेणारा शिक्षक

क) या दोन्ही प्रशिक्षकाने (अ, ब) यांनी आपले स्वतंत्र अहवाल (स्पष्ट अभिप्रायासह) स्पर्धा संपल्यानंतर आठ दिवसाच्या आत संस्थेच्या (MSKA) अधिकृत ई-मेलवर सादर करावे. व मुळ प्रत संस्थेच्या कार्यालयात पाठवून द्यावी.

6) परिस्थितीचा योग्य तो विचार करुन संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध गटाच्या स्पर्धा व तसेच राष्ट्रीय स्पर्धा पुर्व सराव शिबीराच्या किंवा ईतर उपक्रमाच्या आयोजनाची रुपरेषा ठरविण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने सचिवाला राहातील. (उदा.स्पर्धेच्या तारखा, ठिकाण, कालावधी इत्यादी.)

7) राज्याचे प्रातिनिधिक संघाची सरावासाठी किंवा अंतिम निवड करताना राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत अतिउच्च कामगिरी करणाऱ्या गुणवत्ताधारक खेळाडुंनाच प्रथम प्राधान्य राहील. राजाच्या अंतिम संघाची निवड करताना महसूलचे प्रादेशिक (महसूल) विभागाचा समतोल राखणे अनिवार्य राहील. अशा वंचित प्रादेशिक विभागातील जिल्हा संघाची अतिउच्च सांघिक कामगिरी व त्या संघातील गुणवत्ताधारक खेळाडूलाच प्रथम प्राधान्य राहील. अंतिम संघाच्या यादीत 13 व 14 क्रमांकावर या खेळाडूची नावे असावीत. वंचित प्रादेशिक विभागाचे आरक्षण हे चक्राकार / रोस्टर पध्दतीने राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील गुणवत्तेच्या निकषावर अवलंबून राहील.

8) राज्य संघटनेच्या विविध उपक्रमात संलग्न जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे योगदान घेण्याच्या हेतूने जिल्हा संघटनेने आपल्या जिल्ह्यातील कार्यरत कार्यकर्त्यांची उदा.पंच / प्रशिक्षक इत्यादी मागणी केल्यानुसार निर्धारीत वेळेत राज्यसंघटनेकडे संपूर्ण माहितीसह नावे पाठवावेत. या यादीतील किंवा राज्य संघटनेला योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीचे योगदान घेण्याचा अधिकार MSKA ला राहील. याबाबत जिल्हा संघटनेला आक्षेप घेता येणार नाही.

9) अपवादात्मक परिस्थितीत पराभूत संघातील एखादा खेळाडू जर वैयक्तिक अतिउच्च कामगिरी करीत असेल आणि तो जर राष्ट्रीय स्पर्धेत पहिल्या फळीत

सातत्यपूर्वक खेळण्यासाठी प्रबळ दावेदार असेल तर निवड समितीला अशा गुणवान खेळाडूची निवड करण्याचा अधिकार राहील.

10) संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किंवा तत्सम अधिकृत स्पर्धेचे सहभाग व प्राविण्य प्रमाणपत्राचे वाटप पात्रताधारक खेळाडुनां करण्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य सचिवाची राहील.

11) संस्थेच्या अधिकृत स्पर्धेचे सहभाग व प्राविण्य प्रमाणपत्रावर फक्त अध्यक्ष आणि सचिव या दोघांची नावे राहातील. यापैकी अध्यक्षाची स्वाक्षरी रबरी शिक्याची राहील. सचिवाला मात्र निळ्या कलरच्या शाई पेनने प्रत्येक प्रमाणपत्रावर स्वतःच्या हाताने स्वाक्षरी करणे अनिवार्य राहील.

12) संस्थेच्या प्रत्येक गटाच्या अधिकृत स्पर्धेकरिता तांत्रिक समितीचे सदस्य कामकाज पाहातील. स्पर्धेची गटवारी तयार करणे, भाग्यपत्रक तयार करणे, अंतिम निकाल पत्र तयार करणे, या सर्व दस्तऐवजावर स्वतःच्या स्वाक्षरी करणे, स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी राज्य सचिवाकडे सपुर्द करणे. ही सर्व कामे कटाक्षाने पार पाडण्याची जबाबदारी तांत्रिक समितीला अनिवार्य राहील.

सदरील स्पर्धेचा अंतिम निकाल, भाग्यपत्रक व खेळाडुंच्या जिल्हानिहाय नावासह यादी राज्य सचिवाच्या स्वाक्षरीने साक्षांकित करुन शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी संस्थेच्या संकेतस्थळावर व सलग्न जिल्ह्याच्या ई- मेलवर सार्वजनिक स्वरुपात प्रसिध्द करणे अनिवार्य राहील.

13) राष्ट्रीय स्पर्धेत कबड्डी संघाची कामगिरी प्राविण्य प्राप्त व्हावी यासाठी नियमात अदलाबदल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. घेतलेल्या धोरणात्मक निर्णयास सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे अनिवार्य राहील.

14) MSKA ने नियुक्त केलेल्या प्रशिक्षकांची व निवड समितीच्या पॅनलचा नियुक्ती कालावधी हा त्यांनी निवडलेल्या / मार्गदर्शनाखाली खेळणाऱ्या संघाच्या कामगिरीवर अवलंबून असावा (राष्ट्रीय स्पर्धेत MSKA च्या संघाने जर प्रथम, द्वितीय किंवा तृतीय क्रमांक प्राप्त केला तर त्यांची मुदतवाड आपोआप वाढत जाईल.)

## 39. पंच मंडळ :

संस्थेच्या कब्बडी विकासाच्या कार्यात पंच मंडळाची भुमिका महत्वपुर्ण आहे.

राज्यातील पंचाची गुणवत्ता जेवढी दर्जेदार तेवढी कब्बडी खेळाडुच्या गुणवत्ता वाढीला चालना मिळेल. यासाठी त्यांच्या निर्णय प्रक्रियेला पुर्ण स्वातंत्र्य / स्वायत्ता असणे अंत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे या मंडळाला राज्यातील पंचाचा दर्जा सुधारण्यासाठी पुर्ण स्वायत्ता दिली जाईल.

धोरणात्मक निर्णय घेतानाच फक्त कार्यकारी मंडळाची परवानगी घेणे अनिवार्य राहील.

1) एकुण 7 जणाचा पंच मंडळात समावेश असेल यामध्ये अध्यक्ष व सचिव यांच्यासह 5 सदस्य राहातील. राज्य सचिव हे पदसिध्द सदस्य राहतील.

2) पंच मंडळात एका जिल्ह्याचा एकच सदस्य असेल.(प्रत्येक विभागाला प्रतिनिधीत्व देणे अनिवार्य राहील.)

3) जे पंच वार्षिक पंच शिबीरात सहभागी होतील अशाच पंचाच्या नियुक्त्या त्या वर्षातील स्पर्धेसाठी केल्या जातील.

4) विभागीय पातळीवर पंच शिबीरे वेग वेगळ्या तारखेला आयोजित करावीत . या शिबीरात विभागातील सर्व पंचानी सहभागी होणे अनिवार्य राहील.

   काही वैयक्तिक अडचणीमुळे आपल्या विभागात हजर होता आले नाही तर ईतर ठिकाणी होणाऱ्या शिबीरात सहभागी झालेच पाहिजे (शिबीरासाठी शुल्क आकारण्याचे अधिकार पंच मंडळाला राहतील यातील 75 टक्के रक्कम आयोजक जिल्हा संघटनेला देण्यात येईल.)

5) दोन वर्षानंतर राज्य पंच परिक्षा आयोजित करुन जास्तीत जास्त पंच / क्रीडा शिक्षक राज्य संघटनेला कसे जोडले जातील यासाठी प्रयत्न झाला पाहिजे.

6) नवीन पंचाची नोंदणी व जुन्या पंचाचे दर वर्षी वार्षिक शिबिरात नुतनीकरण करुन घ्यावे.

7) अ, ब, क अशा गटात पंचाचे वर्गीकरण करणे अनिवार्य राहील. यासाठी पारदर्शक ग्रेडिंग परिक्षा घेतली जाईल.

8) कोणत्याही स्पर्धेसाठी वार्षिक नुतणीकरण व वर्गीकरण (ABC ग्रेडिंग) केलेल्या पंचाच्या नियुक्त्या गरजेनुसार गटनिहाय कराव्यात.

9) पंच मंडळाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने किरकोळ नियमावली तयार करण्याचे अधिकार पंच मंडळाला राहातील .मात्र लेखी स्वरुपात ही नियमावली कार्यकारी मंडळाला कळविणे अनिवार्य राहील.

10) दरवर्षी MSKA चे पंच मंडळ जिल्हा संघटनेकडून कार्यरत व पात्र पंचाची यादीची मागणी करेल व प्राप्त यादीतील पंचाच्या आवश्यकतेनुसार नियुक्त करण्याचे सर्व अधिकार पंच मंडळाला राहतील.

11) ज्या पंचाने AKFI ची राष्ट्रीय पंच परीक्षा उत्तीर्ण करून किमान पाच वर्षे पंचगिरी केलेली आहे. अशाच अनुभवी पंचाची (50 वर्षे असावे), पंच मंडळात नियुक्ती केली जाईल.

12) दरवर्षी राज्य पातळीवर पंच उजळणी वर्गाचे आयोजन शक्यतो जुन ते सप्टेंबर महिन्यात करावे.

अ) या शिबारात सलग्न जिल्ह्याचे प्रत्येकी किमान दोन व जास्तीत जास्त पाच पंच सहभागी होतील.

ब) किमान दोन व कमाल तीन दिवसाचे शिबीर शक्यतो वेगवेगळ्या जिल्ह्यात आयोजित करावे. पंच शिबीरात मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञांची TA/DA राज्यसंघटनेने द्यावेत व भोजन व निवास व्यवस्था आयोजक जिल्हा संघटनेने करावी.

क) शिबीराला मार्गदर्शन करण्यासाठी शक्य झाल्यास AKFI च्या पंच मंडळातील तज्ञ सदस्य निमंत्रित करावेत. शक्य न झाल्यास अन्य कोणत्याही तज्ञ व्यक्तीला पाचारण करावे.

13) पंच परिक्षा शुल्क, पंच नोंदणी / नुतनीकरण शुल्क, राज्य किंवा विभागीय पातळीवरील पंच उजळणी वर्गाचे शुल्क ठरविण्याचे सर्व अधिकार कार्यकारी पंच मंडळाला राहातील व त्याची अमलबजावणी पंच मंडळामार्फत केली जाईल.

14) पंचगिरीमधील पक्षपाती निर्णय देणाऱ्या पंचावर कार्यवाही करण्याचा अधिकार पंच मंडळाला राहतील मात्र केलेल्या कार्यवाहीला कार्यकारी मंडळाची मान्यता घेणे अनिवार्य राहील.

## 40. नियमाचा भावार्थ :

असोसिएशनचे ध्येय व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी असोसिएशनने जे नियम व नियमावली संस्थेच्या घटनेत अंतर्भूत केलेली आहे. एखाद्या नियमातून अर्थ स्पष्ट होत नसेल किंवा त्याबाबत कोणी वेगळा अर्थ काढीत असेल तर अंतर्भूत नियमाचा ओघ, अंतस्थ हेतू याचा सर्व बाजूने सारा-सार विचार करुन संस्थेच्या हिताच्या दृष्टीने नियमाचा अर्थ लावण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील. हा अर्थ सर्वांना बंधनकारक राहील याबाबत कोणालाही आक्षेप घेण्याचा अधिकार राहणार नाही.

## 41. विसर्जन :

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास 3/4 सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे घेणे बाबतचे व्यवहार पूर्ण करण्यात यावे. तसेच संस्थेची सर्व शिल्लक मालमत्ता अन्य समान उद्देश असलेल्या संस्थेला दान म्हणून देता येईल. 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 13 व 14 प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. धर्मदाय सहआयुक्त मुंबई विभाग यांची परवानगी घेणे अनिवार्य (नियम क्र.30 ची अटी अनिवार्य)